MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष चौदावे / अंक ५/ मे २०१३

## संपादकीय

### जबाबदारी आणि अधिकारांची जाणीव

स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षात आपण काय मिळवले, असा प्रश्न जर का केला तर 'अधिकारांचे' प्रचंड पीक हे उत्तर खात्रीलायकरित्या देता येईल. मानवी अधिकारांपासून ते अलिकडेच प्राप्त झालेल्या शिक्षणाच्या अधिकारांपर्यंत ही यादी खूपच मोठी आहे. मनुष्य जेव्हा जन्माला येतो, तेव्हाच त्याला जगण्याकरता हव्या असणाऱ्या सर्व अधिकारांचा 'अधिकार' मिळालेला असतो. कुठलेही सरकार किंवा व्यक्ती ते काढून घेऊ शकत नाही. वास्तविक जन्मजात मिळालेल्या अधिकारांची अंमलबजावणी मात्र क्रमाक्रमाने, अनुभवांतून आणि त्यातून मिळणाऱ्या जाणिवेतून होऊ लागते. जेव्हा जबाबदारीची जाणीव प्राप्त होते तेव्हाच 'अधिकारांचे' अस्तित्व टिकून राहू शकते. हे अधिकार व त्यांची दुसरी बाजू असणाऱ्या जबाबदाऱ्या यांतील महत्त्वाची 'जाणीव', म्हणजे स्वतः इतकेच दुसऱ्यालाही जन्मजात अधिकार प्राप्त झाले आहेत ही जाणीव. अधिकाराबरोबर जबाबदारीच्या जाणिवा संस्कारांतूनही समजावून द्याव्या लागतात. यांतूनच लक्षात येते की कुठलाही मानवी अधिकार 'अनिर्बंध' नसतो, त्याची सांगड समाजातल्या प्रत्येक घटकाशी असते. म्हणूनच अधिकारांना जेव्हा जबाबदारीचे कोंदण मिळते, तेव्हांच कोंदणातील 'अधिकार' अर्थपूर्ण, पूरक आणि मानवी जगण्याला सहाय्यक बनू शकतात. जबाबदारीशिवाय असणारा अधिकार हा स्वैराचार किंवा बळजबरी असतो.

'जाणीव' ही एक अत्यंत महत्त्वाची संकल्पना, तसेच अनुभव आहे. काही जाणीवा नैसर्गिक असतात तर काही सांस्कृतिक, सामाजिक असतात. गरोदरपणी आईला आपल्या पोटातील मुलाच्या हालचालींची होणारी पहिली जाणीव ही वर्णनातीत आहे. त्या जाणिवेने नुसत्या कविताच झाल्या असे नाही, तर संपूर्ण संस्कृती त्यावर उभी राहते. या जाणीवेतच आपले सर्व 'अधिकार' आणि 'जबाबदाऱ्या' यांची 'जाणीव' होत असते. यातूनच पुढच्या काळामध्ये बाळाचा आपल्या आईशी व आईचा बाळाशी संवाद चालू असतो. प्रत्येक स्त्रीला आणि पुरुषाला पौगंडावस्थेत आपण 'स्त्री' आणि 'पुरुष' असण्याची जाणीव होते. त्याचवेळी त्यांच्यात शारीरिक व मानसशास्त्रीय बदल होत असतात. हे बदल हेच त्या स्त्री आणि पुरुष यांच्या अधिकारांची आणि जबाबदाऱ्यांची नव्याने सुरुवात असते. म्हणूनच या जाणीवांना संस्कारांचे कोंदण घालावे लागते; तेव्हाच या अधिकारांना 'सृजन' क्षमतेचा अर्थ प्राप्त होतो. पुरुषत्वाच्या आणि स्त्रीत्वाच्या अधिकारांचे हे प्रकटीकरण

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय)**

लैंगिक अवयवांतून होत असले तरी, त्यांच्या जबाबदाऱ्यांची बैठक मात्र सांस्कृतिकच असावी लागते. म्हणूनच हे अधिकार आणि जबाबदाऱ्या म्हणजे लैंगिक शिक्षण नाही. जेव्हा फक्त अधिकारांचा वा फक्त लैंगिक शिक्षणाचा विचार होतो, तेव्हा आजच्यासारखी परिस्थिती निर्माण होते.

आजच्या सामाजिक आणि राजकीय गोंधळाला हीच बेजबाबदार 'अधिकार' संकल्पना कारणीभूत आहे. सिद्धान्तवाद आणि पुरोगामित्वाची बाशिंगे गुडघ्याला बांधून समाज सुधारणा करायला निघालेल्या स्त्री, पुरुष मुक्तिवाद्यांचा यात सिंहाचा वाटा आहे. अपात्री दान जेवढे धोकादायक, त्याहीपेक्षा अपात्री अधिकार भयावह! शुद्ध आकडेवारीवर आधारलेल्या लोकशाहीतून 'अधिकार' प्राप्त करून घेणारे लोकप्रतिनिधी व त्यांतूनच निवडून येणारे मंत्री, संत्री यांच्या राक्षसी कारकीर्दीला यातूनच सुरुवात होते. असले जाणिवशून्य आणि बधिर नेतृत्व, 'अधिकार' आणि 'फुकटे'पणाची खैरात करत असते. यातून फुकटेपणाला चटावलेल्या, लाचार व तेवढ्याच बधिर स्तुतिपाठकांचा वर्ग तयार होत असतो. अशा या नेता– अनुयायी परस्परावलंबी युतीतूनच आपली गेल्या ६०–६५ वर्षांतील लोकशाही विकसित होत गेली. भ्रष्टाचार आणि सामाजिक गोंधळ व त्यातून निर्माण होणारा अन्याय, ही सगळी या अभद्र युतीची अपत्ये आहेत. म्हणूनच आज गरज आहे ती अधिकारांबरोबर जबाबदारीच्या जाणीवेची. जबाबदारीशून्य अधिकारांना यातूनच पायबंद बसू शकेल.

**डॉ. विजय बेडेकर**
संपादक, दिशा

●●●

## विद्या प्रसारक मंडळाचे स्वप्न

*वेळणेश्वर पाहिलं,*
*ऐकली गाज समुद्राची.*
*परशुरामाने कोकण निर्माण केलं ...*
*त्याचाच आवाज तो*
*या सर्वांशी नातं जोडलं*
*आमच्या विद्या प्रसारक मंडळाने*
*टाकत दोन पावले पुढे*
*ओळखून गरज काळाची*
*परशुरामाच्या हातातील परशु घेत*
*घातला घाव कोकणच्या कातळावर*
*आणि सुरू झाली कहाणी*
*विराट स्वप्न प्रत्यक्षात येण्याची ...*
*अभियांत्रिकी गुरुकुलाची ओळखत गरज*
*वर्तमानाचे आरोग्य जपणाऱ्या*
*आमच्या डॉक्टरांनी*
*स्टेथस्कोप लावला कोकणच्या मातीला*
*तिची नाडी ओळखत*
*केली धडपड सुरू*
*डॉक्टरांची विजय मिळवणारी स्पंदने ऐकत*
*समुद्रही घाबरला.*
*आता आपला प्रतिस्पर्धी समोर आहे*
*असा विचार करत, क्षणभर थरारला ...*

**– मोहन पाठक**

●●●

वर्ष चौदावे/अंक ५/ मे २०१३

वर्ष चौदावे/अंक ५ /मे २०१३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १७ वे/अंक ११ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | सायनोट्रक कारखान्याला भेट | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | प्रेममूर्ती एस.व्ही. आणि ५५ ची बॅच | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | ५ |
| ४) | रामचरित मानस | प्राचार्य सी. श्री. मुजुमदार | ८ |
| ५) | श्रीमत् भगवद् गीता - अध्याय चौथा<br>विषय : ज्ञानकर्म संन्यास योग | कै. शं. बा. मठ | १२ |
| ६) | प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं | श्रीमती आशा भिडे | १८ |
| ७) | प्रासादिक | श्री. शरद जोशी | २१ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | २८ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- ❖ दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- ❖ आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर
  कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२
  या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- ❖ www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# सायनोट्रक कारखान्याला भेट

*ट्रक निर्मितीच्या कारखान्याची भेट याचे वर्णन करणारा लेख-संपादक*

विज्ञान प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी आम्ही जेव्हा चीनला जातो तेव्हा तेथील आयोजक काही प्रेक्षणीय तथा धार्मिक स्थळाला भेट आयोजित करतात. जीनान येथील आयोजकांनी देखील तेच केले. पण त्याचबरोबर त्यांनी एका कारखान्याला भेट आयोजित केली. हा कारखाना ट्रकची निर्मिती करतो आणि त्याचे नाव सायनोट्रेक फॅक्टरी (Sinotruck Factory) असे आहे. जीनान शहराच्या जवळ जेथे औद्यागिक क्षेत्र आहे तेथे हा कारखाना उभारलेला आहे. तेथे जाण्यासाठी अर्थातच आम्हांला गावाच्या बाहेर पडावे लागले. गावाच्या वेशीवर येताच आम्हांला प्रशस्त असे बंदिस्त क्रीडांगण पाहायला मिळाले त्यानंतर थोडी मोकळी जागा आहे. या जागेवर शेती करण्यात येते. साधारणपणे १०-१५ किलोमीटरवर एक भलीमोठी औद्योगिक वसाहत आहे. याच वसाहतीत सायनोट्रकचा कारखाना आहे.




**कारखान्याची भव्य इमारत**

आयोजकांनी कारखान्याच्या भेटीची परवानगी आधीच घेतली होती. त्यामुळे आम्हांला कारखान्याच्या आवारात प्रवेश करायला मुळीच वेळ लगला नाही. सर्वांत आधी एका सभागृहात बसवून चित्रफितीच्या सहाय्याने तेथील आधिकाऱ्यांनी आम्हांला माहिती दिली. त्यानंतर प्रत्येकाला हेल्मेट देऊन कारखाना दाखवायला घेऊन गेले. कारखान्यात येणाऱ्या व्यक्तीना माहिती देण्यासाठी चांगले प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. प्रदर्शनाच्या पहिल्या दालनात आम्ही शिरलो. या दालनात ट्रकचे वेगवेगळे भाग ठेवलेले आहेत. प्रत्येक भागाजवळ त्याची माहिती लिहिलेली आहे. आपण पूर्ण झालेला ट्रक एकसंध पाहतो. त्यात एवढे वेगवेगळे भाग असतात याची आपल्याला कल्पना देखील येत नाही. इंजिन, गिअरबॉक्स, चाके, ब्रेकची व्यवस्था, इंजिनपासून चाकापर्यंत गती घेऊन जाणारा भाग, ट्रकचा आधार (चासी), ट्रकमधील स्प्रींग, त्यातील प्रकाशयंत्रणा, ड्रायव्हरसाठी बसण्याची खुर्ची, ट्रकचे आच्छादन, त्यातील बॅटरी असे अनेक भाग तेथे क्रमाने आणि अतिशय पद्धतशीरपणे ठेवलेले होते.



**ट्रकचे वेगवेगळे भाग**

स्वयंचलित यंत्राचा सगळ्यात महत्त्वाचा भाग म्हणजे त्याचे इंजिन. या इंजिनात अनेक सुधारणा होत गेल्या. म्हणून केवळ इंजिनासाठी एक वेगळे दालन तेथे निर्माण केलेले आहे. यात इंजिनाचा विकास कसा झाला यापासून वेगवेगळ्या कंपन्यांची इंजिने कशी असतात याची माहिती मिळते. त्याचबरोबर वेगवेगळ्या वाहनात कोणते इंजिन वापरतात याचीही माहिती मिळते. हे प्रदर्शन पाहताना अंतर्गत ज्वलन इंजिनाचे (Internal Combustion Engine) चांगले ज्ञान आपल्याला मिळते. महाविद्यालयीन स्तरावर भौतिक शास्त्र शिकताना या बाबीचा मी अभ्यास केला होता. परंतु ते शिक्षण पूर्णपणे खडू फळ्यावर आधारलेले होते. एवढ्या वर्षानंतर मी त्या सगळ्या बाबींचा प्रत्यक्ष अनुभव घेत होतो. त्यामुळे पुन:प्रत्ययाचा आनंद मला लाभत होता.



**दोन वेगवेगळी इंजिने**

प्रदर्शन पाहून झाल्यानंतर आम्हांला कारखाना दाखविण्यासाठी नेण्यात आले. इंजिनाची किंवा इतर भागाची निर्मिती जेथे करतात तो विभाग आम्ही दुरूनच पाहिला. कारण तेथे उच्च तपमानाच्या भट्ट्यांमध्ये काम चाललेले असते. परंतु जेथे ट्रकचे वेगवेगळे भाग एकत्र करतात तो विभाग आम्हांला जवळून पाहता आला. एक सरकता पट्टा असतो. त्यावर ट्रकचा सांगडा पुढे पुढे सरकत असतो. मध्येमध्ये ट्रकला एकेक भाग जोडणारे लोक असतात. आपला भाग जोडून झाला की ट्रक पुढे सरकवतात. अशाप्रकारे एकमेकाशी काहीही न बोलता काम चालू असते.



**असेंब्ली लाईन**

ट्रकचा सांगाडा आला की पहिल्या गटातील लोक त्याला चाके लावतात, दुसऱ्या गटातील लोक त्याला इंजिनापासून चाकापर्यंत गती आणणारा दांडा बसवितात, तिसरा गट विजेची यंत्रणा बसवतो, चौथा गट आच्छादन आणि खुर्ची बसवतो, पाचवा गट इंजिन बसवतो, सहावा गट टायर बसवतो आणि सातवा गट ट्रक रंगवितो. यांतील थोडेसेच काम यंत्राद्वारे होते. बरेच काम माणसाद्वारे केले जात होते. इमारतीच्या सुरुवातीला केवळ एक सांगाडा येतो तर इमारतीच्या टोकाला एक पूर्ण ट्रक बाहेर पडतो. यांतील सगळी कामे इतकी पटापट होतात की काही वेळातच ट्रक पूर्ण होतो. त्या ठिकाणाहून बाहेर पडतो, तोच आपल्याला पूर्ण झालेले अनेक ट्रक पाहायला मिळतात.



**पूर्ण झालेले दोन ट्रक**




**कारखान्याचे ब्रीदवाक्य**

**-डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, वैभवनगरी, काटई
शीळरोड, जि. ठाणे

●●●

# प्रेममूर्ती एस.व्ही. आणि ५५ ची बॅच

*ठाण्याच्या शैक्षणिक विश्वात डॉ. वा. ना. आणि एस.व्ही या शैक्षणिक जगताच्या पाया घालणाऱ्या संस्था होत्या. एस. व्हींच्या ५५ च्या बॅचचा हा लेख – संपादक*

गुरुवर्य एस. व्ही. कुलकर्णी अथवा नुसतं एस.व्ही. म्हटलं तरी या ठाणे शहरातील असंख्य आबालवृद्धांची मान नतमस्तक होते. माझा जन्म खारकर आळीतला आणि लहानपणही तिथंच गेलं. त्यामुळे मो. ह. विद्यालयात दाखल होण्याच्या आधीपासून सरांना आणि बाईंना दारावरून जाता येताना पाहत होतो. एक अत्यंत सुसंस्कृत, शांत आणि शालीनतेचा आदर्श ठरणारं असं ते जोडपं होतं. सरांच ते धीम्या गतीचं चालणं आजही नजरेसमोर आलं की अनेक आठवणींनी मन भरून येतं मो. ह. विद्यालयाचा विद्यार्थी झालो हे माझं भाग्य. पण त्यातही सरांच्या आवडत्या ५५ च्या बॅचमध्ये होतो हे माझं परमभाग्य.


श्री. एस. व्ही. कुलकर्णी

सर एक आदर्श शिक्षक होते. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला नसेल पण हजारो विद्यार्थ्यांच्या आणि इतरेजनांच्या हृदयात त्यांना जे आदराचं, मानाचं स्थान होतं तोच त्यांचा सर्वश्रेष्ठ पुरस्कार होता. ते जसे आदर्श शिक्षक होते तसेच आदर्श प्रसारकही होते. ठाणे शहरातील शिक्षणापासून खेळापर्यंतच्या अनेक उपक्रमांत त्यांचा सहभाग असायचा, त्यांचं मार्गदर्शन घेतलं जायचं. त्यांच्या या आदर्श अशा प्रशासकीय कर्तृत्वामुळे १९५४ साली जनरल एजुकेशन इन्स्टिट्यूटचा कारभार सक्षम आणि सुरळीत करण्यासाठी त्यांच्यावर प्रमुख कार्यवाहाची जबाबदारी सोपवण्यात आली. संस्थेवरील प्रेमापोटी त्यांनी ती जबाबदारी स्वीकारली. पण विद्यार्थ्यांवर मनःपूर्वक प्रेम करणाऱ्या आणि त्यांना शिकवण्यात परमानंद मानणाऱ्या सरांना ते रुक्ष प्रशासकीय काम करण्याने आपली अवस्था ''जल बिन मछली'' सारखी झाली आहे असे वाटत होतं. त्यातून त्यांची लाडकी बॅच ११ वीच्या उंबरठ्यावर पोहोचलेली. पण मग सरांनी त्यातून तोडगा काढला. आमचे सकाळी इंग्रजीचे तास घेऊन मगच ते दादरला जाऊ लागले.

त्यांच्या अखेरच्या आयुष्यात आपल्या सर्वच विद्यार्थ्यांवर असणारं त्यांच प्रेम सतत व्यक्त होत असे. माझ्याजवळ आमच्या खारकर आळीतील प्रत्येक घरातील त्यांच्या विद्यार्थ्यांची चौकशी व्हायची. '' हा कसा आहे, तो काय करतो, ती आता कुठे असते?'' आपला एखादा विद्यार्थी आता फार मोठा झाला आहे हे ऐकून खूप आनंद व्हायचा; मात्र एखादा विद्यार्थी कुठे तरी भरकटला आहे हे ऐकून त्यांच्या हृदयातलं सारं दुःख त्यांच्या चेहेऱ्यावर दिसायचं आणि मग ते हळूच विचारायचे ''पण, नरेन्द्र, हे कसं काय झालं? किती चांगला मुलगा होता तो?'' साऱ्याच मुलांवर त्यांचं प्रेम होतं. मात्र अचानकपणे ५५ च्या बॅचच्या मुलाना एकत्रितपणे भेटण्याची इच्छा ते सातत्याने अविनाश कोर्डेकडे व्यक्त करू लागले. मग अविनाश आणि सरांचा 'बलक' (बलवंत लक्ष्मण कर्वे) यांनी पुढाकार घेतला. ठाण्यातील आम्हां सर्वांना निरोप मिळाला आणि मग २३ फेब्रुवारी २००२ रोजी स्नेहसंमेलन

आणि सरांचा सत्कार असा कार्यक्रम ठरला.

कार्यक्रमाची तारीख जसजशी जवळ येऊ लागली तसतशी आत्यंतिक प्रेमापोटी निर्माण होणारी सरांची "anxiety" वाढू लागली. आमच्यापैकी कोणी भेटलं तर विषय फक्त संमेलनाचा असायचा. कोण कोण येणार; याचा पत्ता मिळाला का? आता ती कुठे असते? तिला कसं गाठणार? शेवटी शेवटी तर ते म्हणू लागले– ''अरे माझं काही बरं वाईट झालं तरी कार्यक्रम रद्द करू नका.'' आम्ही म्हणायचो – ''सर असं काही बोलू नका, काळजी करू नका!'' पण एका बाजूला मुलांविषयीच प्रेम, त्यांना भेटण्याची उत्कंठा आणि दुसऱ्या बाजूला ढासळणारी प्रकृती यांच्या कचाट्यात सापडलेलं त्यांच मन त्यांना अस्वस्थ करत होतं.

कार्यक्रमाच्या आधी २ दिवस तर ही भावना शिगेला पोहोचली आणि सरांना डॉ. सतीश वैद्याच्या नर्सिंग होममध्ये दाखल व्हावं लागलं. कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी रात्री आम्ही चिंताग्रस्त मनानेच नर्सिंग होममध्ये गेलो. तर डॉ. वैद्य म्हणाले –''पेशंट डिस्चार्ज मागतोय. तसे ते क्लिनिकली फिट आहेत. घरी न्यायला हरकत नाही.'' अविनाशनं आपल्या गाडीनं त्यांना घरी सोडलं. पण रात्री त्यांची बेचैनी वाढली. रात्री २ वाजता फोन करुन त्यांनी अविनाशला बोलवून घेतलं. अविनाश आणि त्याची डॉक्टर पत्नी २ तास त्यांच्याजवळ बसून होते. ही सारी हकिगत आम्हांस सकाळी समजली.

दुपारी ४ वाजता आम्ही सारे शाळेत जमलो. काहीशा चिंतेतच सरांना आणण्यासाठी गाडी पाठवली. अर्ध्या तासांत सरांना घेऊन गाडी आली. सर गाडीतून उतरले. समोर सारे विद्यार्थी, विद्यार्थीनी उभे होते. त्या सर्वांना पाहून सरांच्या मनावरचं दडपण कुठल्याकुठे पळालं आणि त्याची जागा आता प्रचंड उत्साहानं घेतलेली दिसली. सर्वांबरोबर प्रथम फोटो काढण्याचा कार्यक्रम झाला सरांना पायऱ्या चढायचा त्रास नको म्हणून त्यांना खुर्चीतूनच वर उचलून नेण्याचे ठरवले होते. पण आता सरांच्या अंगात पूर्वीचा जोम आणि उत्साह संचारला होता. ते स्वतः पायऱ्या चढून वर गेले.

त्यावेळी आम्हां सर्वांच्या मनांत असणाऱ्या भावना व्यक्त करणारं एक काव्य, शाळेतील शिक्षक श्री. अविनाश बर्वे यांनी केलं होतं. कवितेचं शीर्षक होतं –

**''पंचावन्नची बॅच आपली, भेटण्या स.वि.ना पातली''**

एस.व्ही. साठी आपण सगळे मुलेच होऊन जाऊ
बालपर्णीच्या जगात क्षणभर हिंडुनीया येऊ
पद, पैसा अन् नांव प्रतिष्ठा विरुनीया जाऊ।।

पंचावन्नची बॅच आपली
जगभर जरी ती असे पांगली
शब्द 'एस.व्ही.' कानी पडता
ओढीने त्या क्षणांत जमली।।

शाळेमधली नाती आपुली
मनांत आपण सदैव जपली
शतक अर्ध उलटले तरी ही
गोडी त्यातली जरा न घटली।।

अभिवादन एस.व्ही. ना करण्या जमलो आपण
दिन सोन्याचा करण्यासाठी जमलो आपण।।

कार्यक्रम छान झाला. ५ मिनिटं बोलण्यासाठी उभे राहिलेले सर १०/१५ मिनिटं बोलले. जुने वर्गमित्र एकमेकांना भेटले. सर्वांनाच खूप आनंद झाला होता. पण सरांना झालेला आनंद अवर्णनीय होता.

पुढे बरेच दिवस आमच्यापैकी कोणी भेटला की सर आवर्जून सांगत–''अरे तुमच्या त्या कार्यक्रमानं मला संजीवनी मिळाली''.

खरं म्हणजे त्या काळात आमच्याच बॅचचा कशाला,

कोणीही विद्यार्थी भेटला तरी सर आनंदित होत. त्याच्याशी चार गोष्टी करत. त्या जुन्या काळात रमून जात. त्यांच्या दृष्टीने तो अमृताचा एक थेंब होता. आमच्या कार्यक्रमाने असे ७५ थेंब सरांना एकाच वेळी मिळाले होते. सरांच्या तशा खूप आठवणी आहेत, पण विद्यार्थ्यांविषयी त्यांच्या मनात असणारं प्रेम हे त्यांच सर्वश्रेष्ठ वैशिष्ट्य.

परवा सदानंद भिसेनं एक आठवण सांगितली. एका कार्यक्रमात तो म्हणाला होता सरांच्या नावातच सविनय वृत्ती आहे. काहीजण म्हणतात एस्. व्ही. म्हणजे शांत वृत्ती अथवा सौजन्य वृत्ती, शालीन वृत्ती अथवा सुकोमल वृत्ती. कुणाला त्यांची शेक्स्पियर प्रीति आठवते. मला मात्र ते कायम भासले ते एक प्रेममूर्ती म्हणूनच!

**– श्री. नरेन्द्र नाडकर्णी**
सीडी. १०१, सी. १,
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी – २५३३३१६०
E-mail : nd_nadkarni@yahoo.com

●●●

***आमच्या संस्थेचे जेष्ठ कार्यकर्ते मा. ना. पाटील यांचे निधन झाले. त्यांच्याविषयी आदरभाव व्यक्त करणारे काही लेख दिशाकडे आले आहेत. आणखी ही कुणाला लेख द्यायचा असल्यास १५ मे पर्यंत द्यावा. जूनच्या अंकात हे लेख एकत्रित घेण्यात येतील.***

## स्वामी विवेकानंदांचे विचार

*स्वामी विवेकानंदांनी स्व-प्रतिमेवर भर देताना म्हटले आहे, जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व जगाशी असणारे आपले संबंध यावर अवलंबून असतात. एखाद्या माणसाच्या मनात न्यूतत्वाची किंवा निम्न व्यक्तिमत्त्वाची भावना असेल तर जग आपल्याशी नीट वागत नाही असे त्यास वाटेल. प्रत्यक्षात मात्र तसे नसते. दुसरे जर हसत असतील तर अशा व्यक्तीस ते आपल्याला बघून हसताहेत असे वाटते. काही वेळा अशी अवस्था परिस्थितीतून निर्माण होते. स्वामीजी म्हणतात, नकारात्मक विचार तुम्हांला कमकुवत करतात. अभ्यासासाठी मागे लागणारे पालक मुलाला 'मूर्ख' म्हणतात. तेव्हा कय होते? तुम्ही त्यांना गोड शब्दात प्रोत्साहन दिल तर ती मुले नक्कीच सुधारू शकतात.*



*प्रबुद्ध भारतखंड ११८ प्र. १ जाने १३*
*'सायकॉलॉजिक आयडिआस ऑफ स्वामी विवेकानंद' पृ. १०-११३*

**– संकलित**

●●●

# रामचरित मानस

*लेख मालेतील पुढील लेख – संपादक*

**जब जदुबंस कृष्न अवतारा। होइहि हरन महा महिभारा।।**
**कृष्न तनय होईहि पति तोरा। बचन अन्यथा होइ न मोरा।।**

पृथ्वीचा भार हरण्याकरिता जेव्हा यदूवंशात कृष्णावतार तेव्हा तुझा पति त्यांच्या मुलगा होईल (पद्युन्म) तेव्हा तुझ आणि त्याचे मिलन होईल, हे माझे वचन खोटे होणार नाही. शंकरजींच हे वचन ऐकून रतिचे समाधान झाले. सर्व देवांना हा समाचार कळला. ते ब्रह्म देवाकडे गेले. विष्णुंसह सर्व देव कैलास पर्वतावर पोहचले. सगळ्यांनी शिवजींची वेगवेगळी स्तुती केली. शंकर भगवान प्रसन्न झाले. ब्रह्मदेवाला विचारलं आपण सगळे का आलात ब्रह्मदेव म्हणाले, हे प्रभो आपण अंर्तज्ञानी आहात. अर्थात आम्ही का आलो आहोत हे आपणांस ठाऊक आहेच. तरी पण भक्तीवश मी आपणांस विनंती करीत आहे की आम्हा सर्व देवतांची इच्छा आपण पूर्ण करावी. आम्ही सर्व आपला विवाहाचा सोहळा बघण्यास उत्सुक आहोत. इथल्या सर्व चौपायी सुंदरच आहेत.

**दोः– सकल सुरन्ह के हृदयँ अस संकर परम उछाहु।**
**निज नयनन्हि देखा हहि नाथ तुम्हार बिबाहु।।**
**यह उत्सव देखिअ भरि लोचन।**
**सोइ कछु करहु मदन मद मोचन।।**

कामदेवाच्या मदाचा चूर करणारे हे मदमोचन असे काही करा की सर्व लोक हा उत्सव आम्ही स्वतःच्या डोळ्यांनी बघू.

**कामु जारि रति कहुँ बरु दीन्हा।**
**कृपासिंधु यह अति भल कीन्हा।।**

कामदेवाला जाळून रतिला वर दिला हे आपण फार चांगले केलं.

**सासति करि पुनि करहि पसाऊ।**
**नाथ प्रभुन्ह कर सहज सुभाऊ।।**

प्रथम दंड करून मग परत कृपा करायची हा तर श्रेष्ठ स्वामींचा सहज स्वभावच असतो.

**पारबती तपु कीन्ह अपारा। करहु तासु अब अंगीकारा।।**

तिचा अंगीकार करा म्हणजे तिचा स्वीकार करा.

**सुनि बिधी बिनय समुझि प्रभु बानी।**
**ऐसेइ होउ कहा सुखु मानी।।**

ब्रह्माजींची विनंती ऐकून आणि प्रभु रामचंद्रजींच्या वचनांना आठवून श्री शंकरजी प्रसन्न पूर्वक असेच होईल असे म्हणाले,

**तब देवन्ह दुंदुभी बजाई बरषि सुमन जय जय सुर साई।।**

हे ऐकून देवतांनी नगारे वाजवले आणि फुलांचा वर्षाव करत जय जय हो देवताचे स्वामीची जय हो असा जय जयकार केला. उचित वेळ समजून सप्तर्षि आले आणि ब्रह्माजींनी त्यांना हिमालयाच्या घरी पाठवलं. प्रथम ते जेथे पार्वती होती तिथे गेले आणि तिला राग येईल म्हणून खोटे पण मधुर आवाजात म्हणाले,

**कहा हमार न सुनेहु तब नारद के उपदेस।**
**अब भा झूठ तुम्हार पन जारेउ कामु महेष।।**

त्यावेळी नारदाच्या उपदेशावर विश्वास ठेऊन तू आमचं म्हणंण ऐकलं नाही. आता तुझा पण ही खोटा

होणार आहे. कारण महादेवांना कामाला जाळून टाकलं आहे. (त्यामुळे ते आता मुळी लग्नच करणार नाही) पुन्हा इथल्या चौपाया फारच सुरेख आहेत.

**सुनि बोली मुसुकाइ भवानी।**
**उचित कहेहु मुनिबर बिग्यानी।।**
**तुम्हरें जान कामु अब जारा।**
**अब लगि संभुर हे सबिकारा।।**
**हमरे जान सदा सिव जोगी।**
**अज अनबद्य अकाम अभोगी।।**
**जो मैं सिव सेये अस जानी।**
**प्रीति समेत कर्म मन बानी।।**
**तौ हमार पन सुनह मुनीसा।**
**करिहहि सत्य कृपानिधी ईसा।।**
**तुम्हा जो कहा हर जरिउ मारा।**
**सोइ अति बड अविवेकु तुम्हारा।।**
**तात अनल कर सहज सुभाऊ।**
**हिम तेहि निकट जाइ नहि काऊ।।**
**गएँ समीप सो अवसि नसाई।**
**असि मन्मथ महेस की नाई।।**

पार्वती सांगते की हे मुनिंनों तुम्ही सांगता की कामला जाळल्यामुळे शंभू आता विकारयुक्त झाले. मला ते नेहमीच जोगी, अनिन्दा, कामरहित, भोगहीन असेचं वाटतात. त्यांना असे समजूनच मी जर त्यांची पूजा भक्ती प्रीती केली असेल तर परमेश्वर माझी प्रतीक्षा खरी करेल. आणि तुम्ही शंकरानी काम जाळला असं म्हणता तो तुमचा अविवेक आहे. अग्निचा स्वाभाविक स्वभावच आहे की पाला पाचोळा त्याच्याजवळ जाऊच शकत नाही आणि गेलाच तर तो त्याला नष्ट करणारच. महादेव आणि कामदेव ह्यांच्या बाबतीतही हेच घडलं आहे. त्यामुळे शिवजींचा दोषच नाही. दोष कामदेवाचाच आहे.

दोः– **हियँ हरषे मुनि वचन सुनि देखि प्रिति विश्वास।**
**चले भवानिही नाइ सिर गए हिमाचल पास।।**

९ ते १०२ दोहे ह्यामध्ये शिवपार्वतींच्या लग्नाचे पूर्ण वर्णन केले आहे.

वाङ्मयात नवरस आहेत. तुलसीकृत श्रीरामचरित–मानसांत ह्या नवरसांचा खूप ठिकाणी अनुभव घेता येतो. अर्थात भक्तिरसांचा महापूरच ह्या ग्रंथात आहे. भक्तशिरोमणी तुलसीदास महाराजांच्या भक्तीची पातळी इतकी उच्च दर्जाची आहे की तिची तुलना होऊच शकत नाही. पण हा ग्रंथ वाचल्यानंतर थोडी जरी भक्ती आपण करू लागलो की आपल जीवन धन्य होईल.

बऱ्याच वेळा मला असं प्रश्न पडतो ह्या ग्रंथावरून व्याकरण केल्या गेलं की व्याकरणानुरुप हा ग्रंथ लिहला गेला. श्री. तुलसीदास महाराजांना हे व्याकरण कुणी शिकवलं की त्याचं ज्ञान त्यांना उपजतच होत. अर्थात अगोदर लिहल्याप्रमाणे हे रामायण श्री शंकरजींनी रचले आहे. त्यामुळे त्यांच्या व्याकरणाच्या ज्ञानाविषयी न बोललेच बर. असो. आपण व्याकरण्याच्या व्यापात न जाता हा ग्रंथातील वेगवेगळ्या नवरसांत न्हाऊन निघू.

पुढे सप्तर्षी हिमालयाला भेटले. मदन दहनाची रतिवरदानाची सविस्तर कथा सांगितली. शिवजींची महता जाणून हिमाचलांनी श्रेष्ठ मुनिंना बोलावून शुभ दिवस शुभ नक्षत्र, शुभ घडी शोधून विवाहाची तिथी निश्चित करून लग्न पत्रिका काढून सप्तर्षि तर्फे ती ब्रह्मजींना पाठविली. पत्र वाचून ब्रह्माजींना खूप आनंद झाला. त्यांनी सर्व देवतांना ती वाचून दाखविली सर्व देव समाज आनंदित झाला. आकाशांतून फुलांचा वर्षाव होऊ लागला. सगळीकडे मंगल कलश सजविले गेले. शिवगण श्री शंभुरायांना सजऊ लागले. काय सुंदर वर्णन आहे.

जटांचा मुकुट त्यावर सापांचा समूह, सापांचे कुंडल, सापांचेच कंकण, शरीरावर विभूती, वस्त्रांच्या जागी,

व्याघ्यांवर मस्तकावर चंद्रमा, डोक्यावर गंगा, तीन नेत्र, सापाचे जानवे, गळ्यांत विष त्यामुळे निळा दिसणारा गळा छातीवर नरमुंडलांची माळ. इतका अशुभ वेष असूनही कल्याणाचे धाम असे शिवजी एका हातात त्रिशूल, दुसऱ्या हातांत डमरु घेऊन आपल्या प्रिय नंदीकेश्वरावर बसून लग्नाला निघाले.

ह्या वर्णनाला कोणता रस म्हणायचा. देवांगना ह्या वराला पाहून हसून म्हणतात,

**देखि सिवहि सुरत्रिय मुसु काही।**
**वर लायक दुलहिनि जग नाही।।**

ह्या वरा लायक जगात वधू मिळणे अशक्य आहे. विष्णु आणि ब्रह्मा आपआपल्या देवतांना घेऊन श्री शंकराजींच्या लग्नासाठी निघाले. देवतांचा समूह परम सुंदर होता. पण वराला शोभणारी वरात नव्हती. अर्थात वरातीतील वर शोभत नव्हता. विष्णु भगवानांनी दिकपालांना बोलावून सांगितले की आपण सर्व लोक वेगवेगळे होऊन लग्नाला जाऊ. आमची ही वरात वराला न शोभणारी आहे. दुसऱ्या नगरांत जाऊन स्वतःचे हसे कोण करून घेणार. विष्णूंचे हे बोलणे ऐकून सर्व देवता आपआपली सेना घेऊन वेगळे झाले.

महादेवजी श्री विष्णूंचे हे व्यंग वचन ऐकून मनातल्या मनात हसले. त्यानंतर त्यांनी भृंगीला आपल्या गणांना बोलावून आणायला सांगितले. शिवजींची आज्ञा ऐकून त्यांचे सर्व गण जमा झाले. त्यांना आपल्या स्वामींच्या चरणांचे वंदन केलं. त्यांच्या गुणांचे वर्णन श्री तुलसीदास महाराज्यांच्या शब्दातच बघू.

**नाना बाहन नाना वेषा। बिहसे सिव समाज निज देखा।।**

वेगवेगळे वाहन आणि वेगवेगळ्या वेषांतल्या आपल्या समाजाला बघून शिवजी स्वतःच हसले.

**कोउ मुख हीन विपुल मुख काहू।**
**बिनु पद कर कोउ बहु पद बाहू।।**

कोणाला तोंड नाही तर कोणाला बरीच तोंडे आहेत. कोणी हात पाय नसलेला आहे तर कोणाला बरेच हात पाय आहेत.

**बिपुल नयन कोउ नयन बिहीना।।**
**रिष्टपुष्ट कोउ अति तनखीना।।**

कोणाला खूप डोळे आहेत तर कोणाला डोळेच नाहीत कोणी खूप जाडजूड आहे तर कोणी अगदीच पातळ आहे.

छं :–**तन खन कोड अति पीन पावन कोड अपावन गति घरे।**
**भूषन कराल कपाल कर सब सद्य सोनित तन भरे।।**
**खर स्वान सुअर सृकाल मुख गन वेष अगनित को गनै।**
**बहु जिनस प्रेत पिसाच जोगि जमात बरनत नहि बनै।।**

कोणी दुबळा कोणी जाडजूड कोणी पवित्र कोणी अपवित्र वेष धारणा केलेले आहेत. भयंकर दागिने घातलेले हातात कवट्या घेतलेले सर्व अंगावर ताजे ताजे रक्ताने माखलेले आहेत. गाढव, कुत्रा, डुक्कर इत्यादी प्राण्यांचे वेष धारण केलेल्यांचे वर्णन करता येण्यासारखे आकाराचे गुण जमा झाले आहेत. बरीच प्रेतं पिशाच्च आणि योगिनींच्या वेगवेगळ्या जमाती आहेत त्यांचे वर्णन करणे कठीण आहे.

हा बिभत्स रस आहे. खरोखरच अशा तऱ्हेच्या गणांच्या सेनेला बघून कोणाच्या ह्रदयाचा थरकाप होणार नाही. भूत पिशाच नाच करताहेत खूप मजेत आहेत. दिसण्यात फारच विचित्र दिसताहेत व विचित्र बोलताहेत. जसा 'वर' त्याच्या नुरुपच वरात तयार झाली. मार्गात जाता जाता खूपच तमाशे होत आहेत.

इकडे हिमालयाने लग्नाची तयारी खूपच जोरात केली आहे. जगातील सर्व छोटे मोठे पर्वत नदी नाले ह्यांना निमंत्रित केलेले आहे. सर्वजण सुंदर रूप घेवून समाजासह हिमालयांसह घरी आले आहेत. त्यांचे वैभव बघून

आश्चर्यचकित

**राज बैठि कीन्ही बहु लीला । सकल कहु संकर सुखसीला ।।**

दोहा :- **बहुरि करहु करुना यतन हिन्ह जो अचरज रामा ।**
**प्रजासहित रघुवंसमनि किमि गवने निज धाम ।।**
**प्रश्न उमाऊ सहज सुहाई। छलविहीन सुनि सिव मन भाई।।**
**हर हियें रामचरित सब आए। प्रेम पुलक लोचन जल छाए।।**
**श्रीरघुनाथ रुप उर आवा । परमानंद अमित सुख पावा ।।**

दोहाः- **मगन ध्यान रस दंड जुग पुनि मन बाहेर कीन्ह ।**
**रघुपति चरित महेस तव हरषित बरनै लीन्ह ।।**

आता साधारणपणे चौपाईचा अर्थ लक्षात यायला लागल्यामुळे प्रत्येक चौपाईचा अर्थ देण्याचे कारण नाही असे मला वाटते. मागच्या १०-१२ चौपाईत कैलासपर्वतावरील श्री महादेवांचे वास्तव त्यांचे वर्णन केले आहे. पार्वतीमातेने त्यांच्या जवळ जाऊन आपल्या पूर्वजन्माची आठवण येऊन आपल्याला झालेल्या मोहाची आणि त्यामुळे मिळालेल्या शिक्षेची कबूली दिली. व अजूनही आपल्या मोहामुळे राम जन्माचे रहस्य कळत नाही हे सांगितले व ते विस्तारपूर्वक वर्णन करण्याची विनंती केली. पार्वतीचे विनंतीपूर्वक सरळ व छलहीन बोलणे ऐकून व त्यांना रामचरित्राचे ज्ञान मिळविण्याचा शुद्ध हेतू बघून भगवान प्रसन्न झाले. त्यांच्या हृदयात पूर्ण रामचरित्र आलं. शरीर पुलकित झालं. डोळ्यांत अश्रू आले. ते दोन क्षण ध्यान मग्न झाले. नंतर आपलं मन त्या परमानंदातून बाहेर काढून अतिशय आनंदात रामचत्रिाचे वर्णन करण्यास त्यांनी सुरुवात केली. (क्रमशः)

**प्राचार्य सी. श्री. मुजुमदार**
१०४, फ्लॅट सी-२, इमारत क्रं-३,
सी. एन.सी. रॉयल पार्क,
कांजुरमार्ग, मुंबई - ४०००४२.
भ्रमणध्वनी : ९७६९३१०७४६

●●●

## *भास्कराचार्य*

गणित हा विषय आकर्षण व सोप्या शैलीत सांगण्याची कला होती म्हणून भास्कराचार्यांना 'मूढांनाही गणित शिकविणारा' असे म्हणत. गणिताची उदाहरणे अशी देत की गणित, काव्याप्रमाणे लालित्यपूर्ण व रसाळ होई. त्याकाळात त्यांची कीर्ती जगभर पसरली. त्यांच्या गणित ग्रंथाची कित्येक स्वकीय व परकीय भाषेत भाषांतरे झाली. त्यावर अनेक 'टीकाग्रंथ' (विषय समजण्यास सोपा व्हावा हा उद्देश असे. टीका शब्दाचा सध्याचा अर्थ नाही) लिहिले गेले.

भास्कराचार्य महान गणिती तर होतेच, शिवाय प्रतिभासंपन्न कवीही होते. पाठांतरास सोपे जावे म्हणून त्या त्या विषयाचे ज्ञान, माहिती काव्यबद्ध करुन मुखोद्‌गत करण्याची परंपरा इथे होतीच, पण एकाच रचनेतून द्व्यर्थी शब्दांनी केलेली काव्यरचना वाचताना या गणितीचे कविमन आपल्याला जाणता येते.

'लीलावती' कार म्हणून ते जगप्रसिद्ध झाले. 'सिद्धांत शिरोमणी' या ग्रंथाचा लीलावती हा पहिला भाग आहे. बीजगणित, ग्रहगणित आणि गोलगणित (गोलाध्याय) हे या ग्रंथातील पुढचे तीन भाग आहेत. यावर अनेक टीका (रसग्रहणात्मक) लिहिल्या गेल्या.

लीलावती हे त्यांच्या मुलीचे नाव होते. आपल्या ग्रंथाला 'गणित' शब्द टाळून भास्कराचार्यांनी 'लीलावती' हे नाव दिले. इतकेच नाही तर आपली कन्या लीलावतीला गणित शिकवीत आहेत, अशा प्रकारे त्यांनी ग्रंथातील मजकूर संवादात्मक लिहिला आहे.

**संदर्भ** : शिवमुद्रांकन, डिसेंबर २०१२, पृ.११

# श्रीमत् भगवद् गीता - अध्याय चौथा
## विषय : ज्ञानकर्म संन्यास योग

*कै. शंकरराव मठांच्या गीतेवरील लेख मालेतील चौथा लेख - संपादक*

**श्लोक १ ते १८ सगुणतेचा प्रभाव व निष्काम कर्मयोग**

श्रीकृष्ण म्हणतात अर्जुना मी हा योग विवस्वानाला सांगितला, त्याने मनूला आणि मनूने इक्ष्वाकूला सांगितला. अशा प्रकारे हा योग पूर्वींच्या राजर्षींना परंपरेन समजला. मात्र बराच काळ लोटल्यामुळे पृथ्वीवर तो योग लुप्त झाला आहे. आता हा पुरातन योग तू माझा मित्र आणि भक्त असल्याने मी तुला सांगितला. त्यावर लगेच अर्जुन त्याला म्हणाला – अरे कृष्णा तू तर आता जन्मला आहेस आणि विवस्वानाचा जन्म तुझ्या आधी खूप प्राचीन, असे असताना त्याला तू हा योग सांगितलास हे कसे बरे शक्य आहे? श्रीकृष्ण म्हणाला – अरे अर्जुना माझे व तुझे आता पावेतो पुष्कळच जन्म झालेले आहेत. ते सर्व जन्म मी जाणतो तू जाणत नाहीस. वास्तविक मी अजन्मा आणि अविनाशी आत्मा असे असतानाही प्रकृतीला माझ्या स्वाधीन ठेवून स्वत:च्या शक्तीने मी जन्म घेत असतो. कारण हे भारता ज्या ज्या वेळी धर्मात शैथिल्य येते आणि अधर्माचे फावते त्या त्या समयी मी स्वत:च जन्म घेतो. साधूंच्या रक्षणासाठी, दुर्जनांच्या नाशासाठी आणि धर्माच्या पुन:स्थापनेसाठी मी वेळोवेळी जन्म घेतो. अर्जुना हे माझे दिव्य जन्म व कर्म जाणणारा मानव तो देहत्यागानंतर पुन: जन्माला येत नाही . तो मला प्राप्त होतो. प्रीती, भीती आणि क्रोध यांनी रहित होऊन माझ्यात (ईश्वरात) तल्लीन झालेले अथवा मला शरण आलेले अगर ज्ञान तपाने पवित्र झालेले परमात्मरूप होतात. थोडक्यात जे मानव ज्या हेतूने माझे आश्रय घेतात, त्यांना मी त्याच प्रकारे फळ देतो. हे अर्जुना सर्व प्रकारे माझ्या मार्गाचेच मानव अनुकरण करतात. कर्म सिद्धीची इच्छा करुन बरेच मानव इहलोकी देवतांची पूजा करतात व लवकर फळ प्राप्त करुन घेतात. मानवामध्ये विविधता आढळते कारण मीच त्यांच्या गुणानुरूप घडत असलेल्या कर्मावरून चार प्रकार केले आहेत. मी त्याचा कर्ता असूनही मी अकर्ताच असे समज. (गुणभेदामुळे हे विभाग आढळतात) हे बघ कर्म पळाची मला आसक्ती नाही त्यामुळे कर्मबंध मला होत नाही. हे मला 'जो योग्य प्रकारे जाणतो तो कर्माने बद्ध होत नाही. हे जाणून पूर्वीच्या मुमुक्षु लोकांनीही असेच कर्म केले.' तू, हे अर्जुना, त्यांच्या प्रमाणे कर्माचे आचरण कर. आता तुला असे वाटेल कर्म कोणते? आणि न करणे कोणते? परंतु या बाबत ज्ञानी लोकातही स्पष्टता नाही. म्हणून जे जाणल्याने तू अशुभापासून मुक्त होशील त्या कर्मासंबंधी मी तुला सांगतो. कर्माचे तत्त्व जाणले पाहिजे, विकर्म (निषिद्ध) जाणले पाहिजे आणि अकर्म (कर्म न करणे) हेही जाणले पाहिजे कारण कर्माचे तत्त्व अत्यंत गूढ आहे. ते कसे म्हणशील तर पहा जो कर्म करताना अकर्म (कर्म करत नाही) पाहतो व अकर्मात कर्म पाहतो तोच मनुष्यात बुद्धिमान होय. तोच योगी तोच सर्व कर्मे यथार्थतेने जाणणारा होय.

**श्लोक १९ ते २३ योगी, महात्मे यांचे आचरण व महत्त्व**

सर्व कार्याची सुरुवात जो कामना रहित व संकल्प रहित करतो, जो आपल्या ज्ञानाच्या प्रखरतेने सर्व कर्मे भस्म करुन टाकतो तो ज्ञानी होय. कर्मफळाची आसक्ती सोडल्याने जो नित्य तृप्त होतो आणि परावलंबी न होता स्वसामर्थ्याच्या आश्रयाने जगतो तो कर्म करीत असतानाही

ज्याने स्वार्थत्याग केला तो आशारहित असू शकतो.

कर्म करीत नाही असे म्हणावे. फळाची अशा नाही, अंत:करणात संयम आहे, सर्व भोग साधनांचा त्याग करतो, असा मानव केवळ शरीराने कर्म करत राहिला तरी तो पापी होत नाही. असा मानव सहज प्राप्त होणाऱ्या गोष्टीने समाधानी, सुख दु:खादी द्वंद्वापासून मुक्त, ईर्षा रहित, प्राप्त वा अप्राप्त बाबतीत समबुद्धी ठेवतो असा मानव कर्म करून ही बंधात अडकत नाही. चित्त ज्ञानाने व्याप्त, आसक्ती रहित, केवळ यज्ञासाठीच कर्म करणारा असा मानव मुक्त असतो व त्याचे कर्म पूर्णपणे लयास जाते.

### श्लोक २४ ते ३२ फळ सहित विविध यज्ञ

अर्पण क्रिया ब्रह्म आहे, हवन वस्तु ब्रह्म आहे हवन ब्रह्म आहे अशा प्रकारे ज्या मानवाच्या बुद्धीने सर्व कर्म ब्रह्मरूप झाले तो ब्रह्मच प्राप्त करतो. कोणी कर्मयोगी देवताविषयक यज्ञ करतात. आणि कोणी ब्रह्मरूप अग्नीत यज्ञद्वारे यज्ञाचेच यजन करतात. आणि कोणी श्रोत्र आदि इंद्रियांचे संयम हाच अग्नी कल्पून हवन करतात तर अन्य काही शब्दादि विषयांचे इंद्रियरूप अग्नीत हवन करतात. आणखी काही ज्ञानाने प्रज्वलित झालेल्या आत्म संयमरूपी योगाग्नीत सर्व इंद्रियांचे व प्राणकर्मांचे हवन करतात. दुसरे कोणी अगदी कठीण व्रत करणारे, द्रव्याने यज्ञ करणारे, तपोयज्ञ करणारे, योगयज्ञ करणारे, आणि स्वाध्याय ज्ञानाने यज्ञ करणारे यति तसेच कित्येक अपानात प्राणांचे आणि प्राणात अपानांचे हवन करतात व इतर काही प्राण अपानांचा गतिरोध करून प्राणायाम आचरतात. काही लोक आहार नियमित करुन प्राणात प्राणांचे हवन करतात. हे सर्व लोक यज्ञ तत्त्व जाणणारे व यज्ञद्वारा आपले पाप दूर करणारे असतात. हे अर्जुना हे यज्ञ करून राहिलेल्या अमृताचे भोजन करणारे सनातन ब्रह्माला प्राप्त होतात. यज्ञान करणाऱ्याला हा लोक सुखकारक होत नाही त्याला परलोकात तरी सुखा कोठून मिळणार? अशा प्रकारे अनेक तऱ्हेचे यज्ञ वेदांमध्ये विस्तारित झाले आहेत. हे सर्व यज्ञ कर्मापासून होतात. याचे ज्ञान झाल्यास तू मुक्त होशील.

### श्लोक ३३ ते ४२ ज्ञान महात्म्य

हे अर्जुना द्रव्यमय यज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ अधिक कल्याण करणारा आहे. कारण हे पार्था सर्व प्रकारच्या कर्माचे पर्यवसान ज्ञानातच होते. हे ज्ञान तुला नम्रता, विवेकाने, प्रश्न विचारून, व गुरू सेवेने प्राप्त होईल. त्या तत्त्वज्ञानी लोकांकडून ते ज्ञान तू समजून घे. हे पांडवा हे ज्ञान जाणल्याने तुला आता झाला आहे तसा मोह कधी होणार नाही. इतकेच नव्हे या ज्ञानामुळे सर्व भूतमात्र तू आपल्या आत्म्यात व माझ्यात (परमात्म्यात) पाहशील. जरी तुझ्या हातून आत्यंतिक पाप घडले तरी या ज्ञाननौकेने पाप तरून जाशील. अर्जुना, प्रज्वलित झालेला अग्नी काष्ठे जाळून टाकतो अगदी त्याच पद्धतीने हा ज्ञानरूप अग्नी सर्व कर्मे दग्ध करतो. कारण ज्ञानासारखी इहलोकी दुसरी कोणती वस्तु इतकी पवित्र नाही. ते ज्ञान योग प्रक्रियेने सिद्ध झालेला मनुष्य योग्य समयी आपल्याच ठिकाणी प्राप्त करतो. श्रद्धायुक्त असलेला व परमनिष्ठ माणूस इंद्रिय संयम करुन ज्ञान प्राप्त करतो ज्ञान प्राप्तीने त्याला लवकरच परम शांति मिळते. जो ज्ञान प्राप्त करून घेत नाही व जो श्रद्धाहीन आहे तो संशयाच्या जाळ्यात अडकतो. अशा मनुष्याचा नाश होतो. संशय ग्रस्ताला इहलोक नाही वा परलोकही नाही. यामुळे त्याला कसलेच सुख लागत नाही. हे अर्जुना योगाच्याद्वारे जो आपल्या सर्व कर्माचा संन्यास करतो जो ज्ञानाने सर्व संशय दूर सारतो तो आत्मबलाने मुक्त होतो. त्याला कर्म बंध चिकटत नाही. हे वीरश्रेष्ठा – अंत:करणातील अज्ञानामुळे घर केलेल्या संशयाला आपल्या ज्ञान शस्त्राने तोडून कर्म योगाचे आचरण कर आणि युद्ध कर.

### कर्माचा सूक्ष्म विचार

या अध्यायात ज्ञानपूर्वक कर्माचा संन्यास करून कर्माच्या सर्व दोषातून सुटण्याची युक्ती येथे सांगितली आहे. यांतील यज्ञ विचार वारंवार मनन करण्याजोगे आहे. अध्यायाच्या प्रारंभीच या गीता शास्त्राची अखंड परंपरा

प्राचीन काळापासून चालत आलेली आहे असे सांगून या परंपरेचा पुनरुद्धार करण्यासाठी आपला प्रयत्न आहे ही गोष्ट भगवंताच्या भाषणातून प्रकट झाली आहे. या प्रकारे भगवान् वारंवार अवतीर्ण होतात आणि या योगाची पुन:पुन: जागृती करतात. ईश्वरभावाची प्राप्ती – ''ज्ञान तपसापूता: मभ्दावं आगता: । ४.१० ज्ञानाने आणि तपाने पवित्र जे बनतील ते ईश्वरीय भावाला प्राप्त होतील. संपूर्ण गीतेचा एकमेव उद्देश म्हणजे नराचा नारायण होणे! जीवाचा शिव बनणे, कित्येकांना ईश्वर बनण्यासंबंधाने शंका आहे. योगयुक्त बनण्याला गीतेत सिद्धी अगर परमसिद्धी प्राप्त होणे असे म्हटले आहे.

## परमसिद्धी

उत्तमात उत्तम ज्ञान जाणल्याने अनेक मुनींना परमसिद्धी प्राप्त झाली आहे. ते प्राप्त करण्याचे साधन, सत्य–ज्ञान, अनासक्ती, मन:संयम, भोगांची अनिच्छा आदि आहेत. ज्याच्या पासून सर्वभूतांची उत्पत्ती झाली, ज्याने सर्व व्यापले आहे, त्या ईश्वराची पूजा आपल्या कर्माने केल्यास मनुष्याला सिद्धि प्राप्त होते. हा सोपा उपाय आहे (गीता१८–४८) यांत दोन गोष्टी प्रमुख आहेत – परमेश्वर आपल्या समोर उपस्थित आहे असे समजणे आणि आपले कर्म त्याला संतुष्ट करण्यासाठी करीत आहे असे समजून कर्म करणे. एवढ्याने देखील मनुष्य शुद्ध, पवित्र व उन्नत होतो. उन्नतीचा हा सोपान सोपा उपाय म्हणून गीतेने सांगितला आहे.

## परमश्रेय

परमश्रेय प्राप्त करून घेण्याचे आणखी एक साधन 'परस्पर सहाय'. समाजात अगर राष्ट्रात ज्ञानी व अज्ञानी अशा प्रकारचे लोक असतात. ज्ञानी शरीराने अशक्त व अज्ञानी सशक्त. अशा वेळी ज्ञानी लोकांनी आपल्या ज्ञानाच्या द्वारे सशक्त अज्ञानी यांना साहाय करावे व सशक्तानी ज्ञानी अशक्ताला साहाय करावे. या प्रमाणे परस्परांच्या साहायाने दोघांचेही कल्याण होते. आपसातील वैमनस्याने सर्वांचीच हानी होते. इथे कल्याण अग श्रेय शब्दाने इहलोकी प्राप्त होणारे सुख असे समजावे. सबळ वा दुर्बळ सापेक्ष आहे. शिकलेला फार कष्टाची कामे करत नसतो. इतर कष्टाची कामे करतात. परस्पर सामंजस्याने समाजात सुस्थिरता निर्माण होऊ शकेल.

## पुनर्जन्म

इथे दोनही पधतीने विचार करावा लागेल. पुनर्जन्म होणे, व पुनर्जन्म न होणे. सामान्य माणूस पुनर्जन्माच्या चक्रात अडकतो. विशेष श्रेष्ठता प्राप्त करणारा जन्म मरणाच्या फेऱ्यातून बाहेर पडतो. ब्रह्म लोकापासून तो तहत सर्व प्रकारच्या प्राणिमात्रापर्यंत जन्म मरणाच्या यातना भोगणारे आहेत. पण जे ईश्वर भावाला प्राप्त होतात त्यांना पुन: जन्म घ्यावा लागत नाही. मां उपेत्य पुनर्जन्म न विद्यते। (गीता ८.१६) इदं ज्ञानं उपाश्रित्यमम साधर्म्य मागता: । सर्गेऽपि नोपजायन्ते प्रलये न व्यथन्तिच। (गीता १४.२) हे ज्ञान प्राप्त करून उपासक ईश्वराच्या गुणधर्मांनी युक्त होतो. त्यानंतर त्याला सृष्टी उत्पत्तीचे वेळी जन्म घ्यावा लागत नाही व प्रलय काळीही त्याला दु:ख होत नाही. परमसिद्धिची इथे स्पष्ट कल्पना होत आहे. मम साधर्म्यम् – ईश साधर्म्यम् – ईश्वर धर्मी होणे हीच अंतिम सिद्धी होय.

## निर्लेपता

मनुष्य या जगात राहतो. यामुळे अनेक प्रकारचे दोष त्याला चिकटण्याचा संभव असतो ते दोष चिकटू नये यासाठी गीतेने एक अपूर्व युक्ती सांगितली आहे. सर्व कर्मे परमेश्वराला अर्पण करून जो अनासक्तीने व्यवहार करतो – उदाहरणार्थ पाण्यात असून कमळ पत्राला पाणी चिकटत नाही त्या प्रमाणे तो निष्कलंक होतो. थोडक्यात कर्म परमेश्वराला अर्पण करणे, भोगांचा संग सोडणे, या युक्तीने मनुष्य सर्व प्रकारचे कर्म करीत राहून निर्दोष होतो. या ज्ञानाने वा उपायाने मनुष्य निष्कलंक होतो.

आतून जो संतुष्ट, तोच कर्म बंधनातून मुक्त.

### कर्मबंध निवृत्ती

कर्मापासून बंधन उत्पन्न होते आणि प्रत्येक मनुष्य नेहमी कर्म करतो म्हणूनच तो कर्म बंधनात अडकतो. अशा परिस्थितीत कशा प्रकारे त्याची यातून सुटका होईल? गीता सांगते – जो भोगात आसक्त होत नाही, ज्याचे चित्त ज्ञानाने परिपूर्ण आहे आणि जो यज्ञार्थ कर्म करतो, त्याचे सारे कर्म नष्ट होते म्हणजे, कर्माचा लय होतो म्हणून बंधनच उत्पन्न होत नाही. याप्रमाणे कर्म करत राहणारा बंधनाना दूर सारतो. यासाठी सर्वांभूती प्रेम, निरिच्छवृत्ती, व एकत्वाची अनुभूती या तिहींची जोपासना मानवाकडून झाल्यास तो मनुष्य कर्माच्या दोषांनी बद्ध होत नाही. राष्ट्र बांधणीच्या दृष्टीने हे तीनही गुण अत्यंत आवश्यक असे आहेत.

आणखी काही उपाय १) कर्म फळाची इच्छा न धरणे २) जे काही मिळते त्यातच समाधानी राहणे ३) द्वंद्वातीत होणे ४) निर्मत्सर असणे ५) फळ प्राप्ती होवो वा न होवो समत्व बुद्धी असणे ६) योगपूर्वक कर्म करणे ७) ज्ञानाने संदेह दूर करणे ८) आत्मबळाने युक्त असणे ९) अहंकार नसणे १०) बुद्धी शुद्ध, पवित्र, निर्मळ ठेवणे इत्यादी.

जो समत्व बुद्धियोगाचे आचरण करतो, ज्याचे अंत:करण शुद्ध आहे, ज्याने मन व इंद्रिये संयमित केली आहेत, आपणा प्रमाणेच सर्व भूतांना मान देतो तो कर्म करीत असूनही अलिप्त राहतो इथे १) समत्वयोगाचे आचरण २) हृदयाची शुद्धता ३) आत्मविजय ४) इंद्रिय संयम ५) सर्वभूतात्मभाव ही पांच साधने कर्म दोष नाहीसा करण्यासाठी सांगितली आहेत. यावरून कर्म दोषापासून अलिप्त राहण्यानेच मनुष्याला सिद्धी प्राप्त होऊ शकते हे ध्यानात येईल.

### मुक्ती अथवा मोक्ष

सर्व अशुभापासून दूर होणे. मुक्ती ही गुह्य ज्ञानाने प्राप्त होते. भगवान म्हणतात इदं गुह्यतमं ज्ञानं प्रवक्ष्यामि – यत् ज्ञात्वा मोक्ष्यसे अशुभात्। (गीता ९–१) पुढे ते म्हणतात, जो श्रद्धेने निर्मत्सरपूर्वक हे मोक्षाचे ज्ञान श्रवण करील तोही नि: संशय मुक्त होईल. पुण्यवंताच्या लोकांना प्राप्त होईल. ईश्वराला शरण जाण्यानेही मोक्ष प्राप्ती होईल। (गीता १८–६६) इतर विचार सोडून शुद्ध भावनेने परमेश्वराला शरण गेल्यास मनुष्य मुक्त होतो. इतकेच काय ईश्वराला यथार्थ जाणण्यानेही मनुष्य मुक्त होतो.

### मुक्तीत शांतीची प्राप्ती

मुक्तीचे हे भाव वर्णन आहे. निर्द्वंद स्थितीचा अर्थ शांती असा आहे. इच्छा, भय, क्रोध, ही शांती भग्न करणारी रूपे आहेत. यापासून दूर होणे याचे नाव मोक्ष वा शांती विहाय कामान् य: सर्वान् पुमान् चरति नि स्पृह:। निर्ममो निरहंकार: स शान्ति अधिगच्छति। (२–७१) सर्व कामना बाजूला सारून, इच्छा, ममता आणि अहंकार यांनी विरहित होऊन जो मानव वागतो त्याला शांति प्राप्त होते. समत्वरुप योगाचे आचरण न करता भोग व इच्छेला वश होणारा फलासक्तीमुळे बंधनात सापडतो. मनुष्याला अक्षय सुख हवे असते. अक्षय सुख, म्हणजेच शांति हे सांगण्यासाठीच सर्वधर्म शास्त्रे आहेत. या संबंधी गीता सांगते – जो बाह्य स्पर्शावर आसक्त नाही, जो आत्म्यातच सुख मिळवितो, जो ब्रह्माशी आपला आत्मा संयुक्त करतो त्याला अक्षय सुख प्राप्त होते. १) विषयासंबंधी अनासक्ती २) परमात्म्याशी योग असे दोन उपाय सांगितले आहेत.

### अमृतत्व प्राप्ती

मरणे याचे नाव अमर होणे; याचे नाव सुख. मर्त्य देहात राहून मनुष्य अमर कसा होऊ शकेल? शीर्यते इति शरीरं। शरीर नष्ट होणारच मग अमरत्वाची प्राप्ती म्हणजे काय? गीतेचा उपदेश मननीय आहे. सुखदु:ख समान मानणाऱ्याला विषय पीडा देत नाहीत. तो अमरत्वाला योग्य होतो. हा मानव अमरत्वाचा अधिकारी आहे स। अमृतत्वाय कल्पते (गीता २–१५) सुखदु:ख समान मानणे ही एक

मोठी तपस्या आहे. आणखी देहधारी मुनुष्य देहाच्या संगतीने उत्पन्न होणाऱ्या तीन गुणांच्या पलीकडे जाऊन जन्ममृत्यू जरा आदि दुःखापासून दूर होतो. जन्ममृत्यू जरा दुःखैः विमुक्तः अमृतत्वं अश्नुते। (गीता १४-२०) आणि अमरत्व प्राप्त करून घेतो. अशा प्रकारे अमृतत्व शांती, अक्षय सुख, परमसिद्धी या सर्वांचा अर्थ एकच आहे यालाच अनामय, अव्यय, शाश्वत पद म्हणतात. अनामय रोगदिकांचे क्लेश नाहीत. अव्यय शक्तीचा नाश होत नाही. शाश्वत - चिरकाळ टिकणारा हे सारे शब्द अक्षय सुख देणाऱ्या अमृतत्वाचे वाचक आहेत.

**परमधाम - परमगती**

ज्याला अव्यक्त आणि अक्षर असे नाव आहे त्याला परमगति म्हणतात. जे स्थान प्राप्त झाल्याने पुन: जन्म लागत नाही ते स्थान. यं प्राप्यन विवर्तन्ते तत् धाम परमं मम। (गीता ८-२१) हे स्थान प्राप्त झाल्यानंतर वारंवार जन्ममरणांचे कष्ट भोगण्याची आवश्यकता राहात नाही. आत्मज्ञान प्राप्त केल्यानेच योग्याला या परम स्थानाची प्राप्ती होते. ही श्रेष्ठ गती प्राप्त करण्याचे आणखी काही उपाय - ॐकार उच्चाराने देहत्याग करणाऱ्याला परमगती प्राप्त होते। (गीता ८-१३) परमात्म्याच्या सर्व व्यापकतेचे ज्ञान प्राप्त केले असता परमगती प्राप्त होते। (गीता १३-२८) जे ईश्वराला शरण जातात तेही परमगतीला प्राप्त होतात। (गीता ९.३२) कामक्रोध लोभ ही तीन नरकाची द्वारे - जो यापासून दूर राहतो व आत्मकल्याण करतो तो परम गतीला प्राप्त होतो (गीता १६-२२) जो स्वैरपणे भोगात आसक्त होतो त्याला सिद्धी वा सुख ही दोन्ही मिळत नाहीत (गीता १६-२३)

**कृतकृत्यता -**

हे गुह्यात गुह्य शास्त्र मी तुला सांगितले हे समजून घेऊन समत्व बुद्धीने जो युक्त होतो तो कृतकृत्य होतो. 'एतत् बुद्धवा बुद्धिमान् स्यात् कृतकृत्यश्च भारत। (गीता १५-२०) म्हणजेच गीता शास्त्राप्रमाणे आपले कर्तव्य कर्म केल्यास मनुष्य परब्रह्याला प्राप्त होतो.

मनुष्य आपली आध्यात्मिक उन्नती निरनिराळ्या मार्गानी करीत परमेश्वर प्राप्ती करुन घेतो, याचेच नाव सिद्धी, मुक्ती, परमपद, प्राप्ती इत्यादि आहे. या साठी विविध साधना अशा -

१) चित्ताची एकाग्रता - मनाची चंचलता हीच सर्व परमार्थ सिद्ध होण्यात विघ्नरूप आहे.

२) संयम - आत्मजय, चित्त संयम, इंद्रिय संयम, मनोनिग्रह मन:शांती हे सारे शब्द संयम वाचक आहेत.

३) अनासक्ती - भोगावर आणि कर्मफलावर ओढ न राहिल्यासच संयम साध्य होतो यासाठी अनासक्त भाव उदित केला पाहिजे.

४) निर्द्वंदता - सुख दु:ख, हानि लाभ, यात न गुरफटणे, समबुद्धी ठेवणे भेदात अभेद अनुभवणे

५) अद्वेष्य - वैरत्याग, निर्भत्सना, असूयारहितता हे अद्वेष्य भाव साधण्याचे उपाय.

६) आत्मवत् भाव - सर्वाना आपल्या सारखे पाहणे. हा फार मोठा अभ्यास आहे.

७) गुणातीतता - निर्मळबुद्धि, निर्गुण समानार्थी

८) समबुद्धि - समत्व योग, सर्वत्र समदर्शन, सर्वत्र समता

९) कर्मयोग - समबुद्धीने कर्म केल्यास मनुष्य उन्नत होतो. ईश्वरार्पण कर्म, कर्तव्य कर्म इत्यादि.

१०) ज्ञानयोग - प्रकृति पुरुष विज्ञान, क्षेत्र क्षेत्रज्ञ ज्ञान, ईशज्ञान, ब्रह्मज्ञान आत्मज्ञान इत्यादी ज्ञानामुळे स्वयंपूर्णता, आत्मबळ, आत्मनिष्ठा, कर्तृत्वरहितता, प्रसन्नता पवित्रता, शांतता यांचा अनुभव प्राप्त होतो.

ईश्वरभक्ती - ज्ञानाने ईश्वरभक्ती करता येते. ईश्वर

परायणता, ईश्वर प्रेम, ईशपूजन, स्मरण आश्रय, एकनिष्ठता, एकाग्र भक्ती इत्यादि. नराचा नारायण होण्यासाठी या ज्ञानाचा उपयोग सूत्र रुपाने इथे परमेश्वर प्राप्तीचे विविध मार्ग सुचविले आहेत. गीतेत या सर्व मार्गांचा उल्लेख आहे. ज्ञान विज्ञान उलगडून दाखविणे हा गीतेचा हेतू आहे. त्यातील कोणता मार्ग ज्याला सोयीचा वाटतो तो त्यानी अंत:करण पूर्वक चोखाळावा तशी संधी प्रत्येकाला देण्यात येत आहे. आणि ईश प्राप्ती करुन घ्यावी. इथे प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणे मार्ग स्वीकारण्यास संधी देण्यात आली आहे. अक्षय सुख प्राप्त करुन घेणे हे सर्वाना शक्य आहे त्यासाठी विविध उपाय गीतेने सांगितले आहेत. इतका सखोल व व्यापक विचार गीता ग्रंथाच्या अध्ययन द्वारे आपणाला प्राप्त होत आहे.

**कै. शं. बा. मठ**

●●●

## प्रदर्शनाबद्दल

ऑस्ट्रिया हा एकेकाळी इस्लाम व ख्रिश्चन यांची युद्धभूमी म्हणून ख्यात होता.परंतु आता ऑस्ट्रिया हा कलाकारांच्या एकत्रीकरणामुळे अधिक ज्ञात होत आहे. अलिकडे ऑस्ट्रियन व मलेशियन कलाकरांनी त्यांच्या कलाविष्काराचे गतवर्षी प्रदर्शन भरवलेले होते. यावर्षी 'मलेशियात दोन जगे : वेगळे दृष्टिकोन' या नावाचे कला प्रदर्शन भरवण्यात आले. कलाकारांनी एकत्र यावे, त्यांच्या ज्ञानकक्षा वाढवाव्यात, सर्जनशीलता वाढवावी हा या सहाकार्याने आयोजित केल्या जाणाऱ्या प्रदर्शनाचा उद्देश आहे. मलेशियातील बँक नेमास वस्तुसंग्रहालय व कला दालन येथे हे प्रदर्शन जानेवारीत भरले होते.

**संदर्भ :** एशियन आर्ट, डिसेंबर २०१२ पृ.२३

**– संकलित**

## आफ्रिकन साहित्याचे पितामह

आफ्रिकन साहित्याचा चेहरामोहरा बदलणाऱ्या चिनुआ अचुबे या नायजेरियन लेखकाचे नुकतेच निधन झाले.

१९५८ साली वयाच्या २८ व्या वर्षी अचुबे यांनी 'थिंग्ज फॉल अपार्ट' ही पहिली कादंबरी लिहिली. पुढे जगातल्या ५० भाषांमध्ये तिचे अनुवाद झाले आणि एकंदर ५० कोटी प्रती विकल्या गेल्या. ब्रिटिश वसाहतवादाचे क्रूर रूप मांडणारी आणि पाश्चिमात्य पूर्वग्रहाविरोधात साहित्याचा प्रभावी वापर कसा करता येतो, याची ही कादंबरी उत्तम उदाहरण आहे. वसाहतवादाविरोधात आपल्या कादंबरीत्रयीमधून मांडलेला जाहीरनामा नंतर जगमान्य झाला. कादंबरी प्रकाशित झाल्यावर तिसऱ्या दिवशी तिची 'टाइम्स लिटररी सप्लिमेंट'ने दखल घेऊन कौतुक केले.

१९६० मध्ये अचुबे यांची दुसरी कादंबरी 'नो लाँगर ॲट इझ' प्रकाशित झाली. 'ॲरो ऑफ ॲरो' ही पुढची कादंबरी १९६४ साली प्रकाशित झाली.

ही आफ्रिकन ट्रायॉलॉजी प्रचंड यशस्वी झाली. कादंबरीलेखनाने त्यांना आफ्रिकन साहित्याचे 'पितामह' बनवले.

**– संकलित**

# प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं

*कवींचा कवितांतून व्यक्त होणारा दृष्टिकोन व त्याची काही उदाहरणे या लेखात आहेत – संपादक*

कवितेची परंपरा प्राचीन म्हणजे अगदी ज्ञानेश्वरांपासूनची म्हणजे १२ व्या शतकापासूनची आहे. पण कथा, कादंबरी, नाटक, निबंध ह्या वाङ्मय प्रकारांचा जन्म इंग्रजी राजवटीतला म्हणजे अर्वाचीन आहे. जुन्या संत कवींच्या ठिकाणी स्वतंत्र प्रतिभा होती तरी तिच्यावर संस्कृतची छाप आहे. आणि अर्वाचीन मराठी कवितेवर इंग्रजीचा जास्त प्रभाव आहे. जुन्या काव्यात विषयाचे वैविध्य नव्हते. कारण गीता भागवतावर टीका लिहिणे, पुराणांचे पंथात रुपांतर करणे यात भक्तिभावनाच फक्त असायची. या भावनेत प्रेम होते पण ते भक्त व भगवंत यांच्यातले म्हणजेच ती भक्तिभावना होती. जनता व विश्वजनिता यांना जोडण्याची जबाबदारी आपल्याच शिरावर आहे ही त्यांची कल्पना होती. म्हणून त्यांच्या काव्यात भक्तिभावना प्रामुख्याने रुजली होती.

ज्ञानेश्वरांनी गवळणी, विराण्या लिहून प्रेमविषय हाताळला आहे. पण हे प्रेम आहे भक्त भगवंता मधले.

घनु वाजे घुणघुणा। वारा वाहे रूणझुणा।।
चंदनाची चोळी माझे, सर्व अंग पोळी
कान्होवनमाळी वेगी भेटता का

ज्ञानेश्वरीत पहिल्या अध्यायाच्या सुरवातीला ज्या निवेदनपर ८५ ओव्या आहेत त्यातल्या ५६ ते ६० ह्या ओव्यांत गीता अभ्यासण्यासाठी, समजून घेण्यासाठी साधकाच्या, ज्ञानेश्वरांसमोर बसलेल्या श्रोत्यांची मनाची स्थिती हळुवार असावी याचे कमालीचे हळुवार वर्णन ज्ञानेश्वरांनी केले आहे. ते प्रत्यक्षच पहायला हवे –

जैसे शारदि चंद्रकळे। माजी अमृतकण कोंवळे।
ते वेचिती मनें मवाळे। चकोर तलगें।।५६।।
तिया परी श्रोता।अनुभवाती हे कथा।
अति हळुवारपण चित्ता। आणुनियां।।५७।।

शरद ऋतूत चकोराची पिल्ले चंद्रकिरणातले अमृत कोमल हळुवार मनाने वेचत असतात त्याप्रमाणे तुम्ही श्रोत्यांनी अंत:करण हळुवार केले पाहिजे.

हे शब्देंविण संवादिजे। इंद्रिया नेणतां भोगिजे।
बोलाआधी झोंबिजे। प्रमेयासी।।५८।।
जैसे भ्रमर परागु नेती। परी कमळदळे नेणती।
तैसी परी आहे सेविती। ग्रंथी इथे।।५९।।
का आपुला ठावो न सांडितां। अलिंगिजे चंद्र प्रगटतां।
हा अनुरागु भोगितां। कुमुदिनी जाणे।।६०।।

आपल्या उगमाविषयीच्या प्रमेयाशी – तत्वाशी शब्दशिवाय संवाद साधा. त्याला जाऊन भिडा पण कसे? तर त्याच्याशी जी अंगलट करायचीय ती अंगाशिवाय करा. हे जे थेट भेटणे आहे या कमलिनीच्या अनुरागाचे वर्णन ज्ञानेश्वर फारच सुंदर करतात. चंद्रकिरणाच्या स्पर्शाने ते फुलते आणि आपली जागा न सोडता चंद्राला अलिंगन देते. अंगसंगशिवाय फुलणारा हा प्रणय, हा अनुराग ती कुमुदिनीच जाणे. गीता समजून घेण्यासाठी अशी संवेदनशील, संयत भाववृत्ती, चित्तवृत्ती पाहिजे असे वर्णन करताना प्रेमाची परमावधी साधली आहे.

कुसुमाग्रजांची 'सूर्यफूल' काय 'पृथ्वीचे प्रेमगीत' काय या कवितांनी प्रेमाची तीच उंची – परमावधी गाठलीय.

---

मीपणा सोडून दिला तर शुभ अशुभाचे बंधन राहत नाही.

'सूर्यफूल' कविता पहा –

| | |
|---|---|
| 'तेजीनिधी येता तो | भूवर मी तो त्योमी |
| तळपत उदयादिवरी | तो अपार पामर मी |
| अग्निकिरण अगणित या | सर्वंकष दृष्टीस त्या |
| धगधगती देहभरी | दिसणार हि मी नाही!' |

ज्ञानेश्वरांची चंद्रविकासिनी कुमुदिनी काय किंवा कुसुमाग्रजांची सूर्यविकासी 'सूर्यफूल' काय दोघांची प्रीती ही शारीर नाही तर आत्मिक आहे. दोन्हींची रचना अप्रतिम आहे. 'पृथ्वीचे प्रेमगीत' ही त्याच जातकुळीतले. आत्मनिष्ठा व वस्तुनिष्ठा यांचे एक आगळेच मिश्रण या कवितेत झालेय. शृंगाराला उदात्ताची उत्तुंगता तीही कलात्मकरित्या या कवितेत साधलीय.

'परी भव्य ते तेज पाहून पूजून
घेऊ गळ्याशी कसे काजवे
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहूनी साहवे!'

पृथ्वीचे प्रेमगीत लिहावे, सुचले नि साधले ते कुसुमाग्रजानाच ! पृथ्वीला सूर्याविषयी वाटणाऱ्या दाहक आणि उत्कटअशा भक्तिसदृश प्रेमाकर्षणावर ह्या प्रेमकवितेची उभारणी आहे आणि म्हणूनच पहिल्या ओळीबरोबर ते आपल्याला उदात्तांच्या अंतरिक्षात नेतात. 'स्वप्नांची समाप्ती' ही देखील त्यांची अतिशय गाजलेली प्रेमकविता म्हणजे कवीच्या कल्पकतेने काठोकाठ भरलेला अमृत कलश आहे असे वि. स. खांडेकरांनी म्हटलंय ते खरंच आहे.

'काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्यांचे हात
क्षितिजाच्यापलीकडे उभे दिवसांचे दूत
ओततील आग जगी दूत त्याचे लक्षावधी
उजेडात दिसू वेडे आणि ठरू अपराधी.

स्वप्न आणि वास्तवाची विदारकता कवीने मोठ्या संगमाने या कवितेत हाताळली आहे. 'प्रीतीसाठी प्रीती' 'मातीचे गायन' या कविताही त्याच धर्तीच्या आहेत.

आधुनिक मराठी कवितेचे जनक 'केशवसुत' यांनी तर पूर्वीच्या भक्तिरसपूर्ण कवितांहून वेगळ्या अशा मानवी भावभावना, निसर्गसौंदर्य वगैरे कल्पना काव्यात आणल्या. त्यांच्या प्रेमकविता कवी व कविता तसेच कवी नि त्याची स्फूर्ती यावर आहेत. स्वत:च्या पत्नीवरही त्यांनी काही प्रेम कविता लिहिल्या. 'रांगोळी घालतांना पाहून' यातल्या साध्याही विषयात आशय कधी मोठा किती आढळे ही ओळ सुभाषित म्हणून प्रसिद्ध झाली. पण केशवसुतांनी प्रेमकविता बऱ्याच लिहिल्या असल्या तरी त्यात वैयक्तिकता नव्हती. इंग्रजी सॉनेट मराठीत आणण्याच्या प्रयोगासाठी 'सुनीत'रचनेसाठी त्या भाषांतरित केल्या आहेत. काही प्रेमकविता काव्याला देखील उद्देशून लिहिल्या आहेत. 'रूष्ट सुंदरीस' 'फिर्याद' थकलेल्या भटकणाऱ्याचे गाणे, वियोगामुळे या त्या कविता होत. शेली, कीटस् वर्डसवर्थ यांच्या काव्यांचा त्यांच्यावर गहिरा परिणाम झाला होता. अनेक प्रेमकविता लिहूनही प्रेमाचे शाहीर ही पदवी त्यांचे चेले 'गोविंदाग्रज' राम गणेश गडकरी यांना मिळाली. त्याचे कारण हेच आहे. गोविंदाग्रजांचे भाषेवर असाधरण प्रभुत्व होते. त्यांची प्रेमगीते भावनोत्कट आहेत. 'गुलाबी कोडे' 'पहिले चुंबन' प्रेम आणि मरण'अल्लड प्रेमास' 'प्रेमाखातर', 'पुनर्जात प्रेमास', फुले वेचली पण, अवेळी ओरडणाऱ्या कोकिळेस अशी किती तरी देता येतील. 'क्षण एक पुरे प्रेमाचा। वर्षाव वर्षाव पडो मरणांचा। मग किती। 'इष्काचा जहरी प्याला नशिबाला ज्यांच्या आला। हा असा भावनोत्कट, प्रेमाचे महात्म्य, प्रेमाचे प्रमत्त वर्णन, औदासीन्याची गडद छाया ही त्यांच्या प्रेमकवितेची वैशिष्ठे आहेत.

भा. रा. तांबे यांच्याही अर्ध्या अधिक कविता प्रेमकविता आहेत. पण ते प्रेम प्रसन्न, पवित्र सात्विक आहे. त्यांची प्रणयगीते अस्सल आहेत अन्य कवींप्रमाणे नकली नाहीत. (हा केशवसुतांना टोमणा असावा) पत्नी प्रेमाच्या

कविता सरस, सुंदर आहेत. 'सहज तुझी हालचाल, सुफलित झाले ग सखी जीवित'जन म्हणती सावली' ह्या कविता उदाहरण म्हणून सांगता येतील. 'काय माझ्या पायी रुतला। शूल तुझ्या उरी कोमल का?। कुणी कोडे माझे उकलिल का! कुणी शास्त्री रहस्य कळविल का? ही तर त्यांची पती पत्नी प्रेमाची अद्वितीय कविता.

माधव ज्यूलियन – 'विरहतरंग' 'तेथे चल राणी' अनिल– 'अजुनी रुसुनि आहे', 'अजुन यौवनात मी', ना. हा. देशपांडे – 'रानात सांग कानात आपुले नाते', 'मी भल्या पहाटे येते', बा. भ बोरकर – 'रमलाचि रात्र', 'समुद्र बिलोरी ऐना ग ।सृष्टिला पाचवा महिना ग ।। यशवंत गिरीश पु. शि. रेगे स्वयंभू प्रतिभेचे कवी 'फुलोरा' 'हिमसेक' हे काव्यसंग्रह 'लंपर ओले वस्त्र होऊनि, अंग अंगतत लिपून घ्यावे. अशा प्रकारची प्रथम शृंगारिक कविता त्यांनी लिहिली. मर्ढेकरांचे 'शशिरागम' हा संग्रह प्रसिद्ध आहे. इंदिरा संताची प्रेमकविता त्यांच्या दिवंगत पति प्रेमाभोवतीच खुंट्याला दोरी बांधल्यागत फिरत होती. असा त्यांच्या कवितेवर आरोप केला जातो. 'स्वप्ने उडाली दिगंती', 'उगीचच हो', 'मी येते तिथवर', 'मीच की', 'शेला' संग्रहातील 'शेला' ही आत्मस्पर्शी प्रेम कविता, 'आकाशीच्या इंद्रधनुवर अशी सुरंगा रहाते रेलून' अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. अजून कित्येक कवी व त्यांच्या प्रेमकविता यांचा आढावा परामर्श घेता येणे शक्य आहे.

**श्रीमती आशा भिडे**

बी/९ विजय अर्पाटमेंटस्,

आराधना टॉकीजजवळ,

ठाणे (प.) ४०० ६०२

दूरध्वनी – २५४१०१४०

मोबाईल – ९३२४०४४७६४

●●●

## *वैद्यकशास्त्र-इतिहास*

*ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने अलिकडेच ऑक्सफर्ड हिस्ट्री ऑफ मेडिसीन हा ग्रंथ प्रकाशित केला आहे. या विषयातील प्रभावी व वैविध्य यांची जागतिक स्तरावरील ओळख यात आहे. वैद्यकीय प्रगती, वैद्यकशास्त्रातील नवे प्रवाह या विषयांवरील यातील लेख तीन विभागांत विभागले गेले आहेत. वैद्यकशास्त्राच्या इतिहासावरील गेल्या काही वर्षातील सर्वांत मोठ्या अशा या ग्रंथात ६०० पेक्षा अधिक पृष्ठे आहेत. जगातील अत्यंत निष्णात अशा ३७ विद्वानींची यासाठी आपल्या लेखांचे योगदान दिले आहे. एक्स्टर विद्यापीठातील वेलकम ट्रस्ट मंडळाचे संचालक प्रा. मार्क जॅक्सन हे या ग्रंथाचे संपादक आहेत.*

***संदर्भ :*** *वेलकम न्यूज, ऑटमन २०११*
*अंक ६८ पृ.७*

**– संकलित**



साहित्य-जगत

# प्रासादिक

प्रसाद कुलकर्णी (बी-३०४, सूर्यमुखी, २६, शास्त्रीनगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४००१०४, दूरध्वनी-०२२/२८७३६३११ मो.-९९६९०७७१३३) यांचे 'प्रसादिक' हे एक अप्रतिम पुस्तक (पृ. १४४, मूल्य १४०/-रु.) नुकतेच ज्योतिर्भास्कर जयंतराव साळगावकर यांच्या हस्ते एका समारंभात प्रकाशित झाले आहे. प्रकाशक आहेत राजेंद्र प्रकाशन (श्रीमती निलीमा कुलकर्णी), महाराजा बिल्डिंग, पहिला मजला, गिरगाव, मुंबई - ४००००४, दूरध्वनी - ०२२/२३८२३५४८, २८३३२४०६ ने ते प्रसिद्ध केले आहे.

## लेखकाचा परिचय

प्रसाद कुलकर्णी हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. संवेदनाशील मनाचा कवी, गीतकार, हजरजबाबी निवेदक, प्रभावी वक्ता, स्तंभलेखक, 'आनंदयात्रा' हा त्यांचा धमाल एकपात्री कार्यक्रम खूप लोकप्रिय आहे. देशाविदेशांतही या लोकप्रिय कार्यक्रमाचे पाचशेहून अधिक कार्यक्रम झाले आहेत. लोकांना आनंदाने जगण्याची प्रेरणा देणारा हा कार्यक्रम असून त्याचे प्रयोग अव्याहत चालू असतात. पाच कवितासंग्रह, दीड डझनाहून अधिक चित्रपट, आघाडीच्या गायक संगीतकारांबरोबर केलेल्या वीस एक ध्वनिफिती, विविध दूरदर्शन वाहिन्यांवरील टॉक शोज, अनेक प्रतिष्ठित जाहिरात संस्थांकरिता कॉपी रायटिंग. त्यांची आणखी विशेष ओळख म्हणजे मराठी भाषेला आणि अस्मितेला त्यांनी मायबोलीतल्या शुभेच्छापत्रांचं कायस्वरूपी दिलेले योगदान, 'शुभेच्छा सम्राट' म्हणूनच ते ओळखले जातात.

## पुस्तकाचे अंतरंग

या पुस्तकात एकूण ६१ लेख आहेत. सारे लेख प्रेरणादायी, आनंददायी, मोठी उर्जा देणारे आहेत. हसत-खेळत खूप काही सांगणारे, सध्याच्या तणवग्रस्त जीवनांतून मुक्त कसे व्हावे हे दिशादर्शक विचार सांगणारे आहेत. कुठचेही पान काढून वाचा तुम्हांला निखळ आनंद देण्याचे, अर्थपूर्ण जीवन कसे जगावे याचे मौलिक दर्शन त्यातून घडते. सुप्रसिद्ध पत्रकार कुमार केतकर यांची सुंदर प्रस्तावना या पुस्तकास लाभली आहे. प्रस्तावनेत शेवटी केतकर म्हणतात, ''प्रसाद वर्तमानात जगणारा माणूस आहे. भविष्यावर विश्वास ठेवणारा कवी आहे. स्वतःवर श्रद्धा असलेला पण अहंकार टाळणारा लेखक आहे. 'भूतकाळाचे गुलाम बनू नका' असे आवर्जून सांगणारा आणि तसेच जीवन जगणारा आनंदयात्री आहे. त्याच्या या निबंध-कवितांनी वाचकांना उमेद येईल, निराशेचे मळभ दूर होईल आणि जीवन ही एक आनंददायी सफर होईल; आणि जीवन ही एक आनंदयात्रा असल्याचा शोध लागेल याची मला खात्री आहे.

पुस्तकाच्या ब्लर्बवरील मजकूर प्रसादचे श्रेष्ठत्व अधोरेखित करणारा आहे. तो उधृत करण्याचा मोह आवरत नाहीए. तो असा- श्री प्रसाद कुलकर्णी हे साध्याही विषयांत आशय कधी मोठा आढळे. ह्या वचनाचा आपल्या लिखाणातून प्रत्यय देत असतात. त्यांच्या लेखनाला उत्तम बळ प्राप्त होवो आणि उद्याच्या महाराष्ट्राचा एक 'प्रासादिक' लेखक म्हणून ते नावारूपास येवोत, अशी शुभेच्छा ह्या त्यांच्या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने व्यक्त करतो- ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर.

''प्रसाद कुलकर्णीची सकारात्मक उर्जा वाटत जाणारी शुभेच्छापत्र वाचून त्यांना मी 'शुभेच्छांचा सौदागर' अस एकदा म्हटलं होतं. त्यांच्या नावातला प्रसाद आता प्रासादिक बनून, जगण्याचा झपूर्झा बनून या नव्या

पुस्तकाच्या रूपानं वाचकांच्या भेटीला येत आहे–मधु मंगेश कर्णिक''

''शब्दांपासून सुरापर्यंत, छोट्या पडद्यापासून हृदयस्पर्शी ध्वनिफितीपर्यं आणि मनामनांतली चेतना जागवून त्यांना आयुष्याच्या समर मैदानावर लढण्यापर्यंत प्रसाद कुलकर्णी यांनी गंभीर पण विधायक प्रवास केलेला आहे. 'प्रासादिक' या नव्या ग्रंथाद्वारे ते पुन्हा रसिकांच्या भेटीला येत आहेत. ही भेट गळाभेट ठरावी आणि येथून पुढेही आपल्या सर्वांना प्रसाद यांचे प्रासादिक शब्द लाभत राहावेत – उत्तम कांबळे''

**मित्रमंडळींना, नातेवाईकांना सप्रेम भेट देण्यायोग्य पुस्तक**

प्रसाद कुलकर्णी यांचे एक मित्र विकास महंते यांनी स्वतःच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त इतरांना सप्रेम भेट देण्यासाठी १५० प्रती खरेदी केल्या आहेत. त्यांचा हा आदर्श वाचकांनी आपल्यापुढे ठेवावा. विविध ग्रंथालयांनी हा सुंदर ग्रंथ अवश्य घ्यावा. थोडक्यात काय, प्रसादचा हा 'प्रासादिक' ठेवा वाचकांनी आपल्या संग्रही ठेवावा. हे उत्तम. लेखक प्रसाद कुलकर्णी व प्रकाशिका श्रीमती निलीमा कुलकर्णी यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**राजहंस प्रकाशन – अग्रेसर प्रकाशन संस्था**

नुकतेच महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार जाहीर झाले. त्यामध्ये राजहंस प्रकाशनाची (१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, फोन –०२०–२४४७३४५९) आठ राजहंसी पुस्तके मानकरी ठरली ती अशी –

१. बखर भारतीय प्राप्तिकराची – मिलिंद संगोराम (सी. डी. देशमुख पुरस्कार)
२. तिमिरातुनी तेजाकडे – डॉ. नरेंद्र दाभोळकर (डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार)
३. सुबोध बायबल – फादर फ्रान्सिस दिब्रिटो (डॉ. ना. गो. नांदापूरकर पुरस्कार)
४. सर आणि मी – ज्योत्स्ना संभाजी कदम (यशवंतराव चव्हाण पुरस्कार
५. लंगडी आजी आणि रावण मामा (अशोक डांगे) – वि. द. घाटे पुरस्कार
६. हम होंगे कामयाब – संदीपकुमार साळुंखे (कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार)
७. चला, क्रिकेट शिकू या' – सुबोध मयुरे (राजर्षि शाहू महाराज पुरस्कार)
८. गंमत शाळा – राजीव तांबे (राजा केळकर पुरस्कार)

**विज्ञान प्रसार**

राजहंस प्रकाशन ही एक मान्यवर प्रकाशन संस्था आहे. संस्थेतर्फे दरवर्षी अनेक दर्जेदार पुस्तके प्रसिद्ध होत असतात. त्यांपैकी कित्येकांना महाराष्ट्र शासनाची आणि इतर मान्यवर संस्थांची पारितोषिके मिळत असतात. विज्ञान विषयक साहित्य हे राजहंस प्रकाशनाचे अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण, महत्त्वाचे आणि समृद्ध दालन विज्ञानातील अनेक प्रस्थापित विषयांपासून अनवट विषयांपर्यंत, विविध पैलूंची अत्यंत सोप्या, रसाळ ओघवत्या शैलीत वाचकाला माहिती करुन देणे, त्या योगे सामान्य माणसाला केवळ विज्ञानाशी परिचित करून देणे नव्हे, तर आजूबाजूला घडणाऱ्या अनेक गोष्टींमधील विज्ञान समजून देणे, विज्ञानात रस निर्माण करणे हा या पुस्तकांची एक प्रमुख उद्देश. विज्ञान, तंत्रज्ञान, शास्त्रीय परिभाषा इ. गोष्टी या फक्त काही निवडक लोकांपुरत्याच मर्यादित असतात. 'आपल्याला त्यात काही कळणार नाही' हा सामान्य माणसाच्या मनातील गंड दूर करणे, त्याला अधिक विज्ञानाभिमुख बनवणे आणि दुसऱ्या दिशेने विज्ञानालाही अधिक लोकप्रिय बनवणे, समाजाभिमुख

बनवणे यासाठी ‘राजहंस प्रकाशन विज्ञानविषयक पुस्तकांच्या निवडीत नेहमीच प्रयत्नशील असते.

### २८ फेब्रुवारी ‘विज्ञान दिन’

दरवर्षी हा दिवस ‘विज्ञान दिन’ म्हणून पाळला जातो. विज्ञानाशी संबंधित अनेक उपक्रम वेगवेगळ्या संस्थांमार्फत या दिवसाचे निमित्त साधून राबविले जातात. उपरोल्लेखित आठ पुरस्कार प्राप्त (राजहंसची) पुस्तकांपैकी दोन पुस्तकांचा या फेब्रुवारीत विज्ञान दिन येत असल्यामुळे ‘राजहंस ग्रंथवेध’ (या संस्थेच्या मासिकाच्या) फेब्रु.२०१३ च्या संपादकीयात त्याचा विशेष उललेख केलेला आहे. (ती पुस्तके म्हणजे डॉ. नरेंद्र दाभोलकर लिखित ‘तिमिरातुनी तेजाकडे’ आणि राजीव तांबे यांचे ‘गंमतशाळा’) दोघांचेही अभिनंदन !

### राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी राजहंस प्रकाशनाचे व्यासपीठ म्हणजे ‘राजहंस ग्रंथवेध’ हे मासिक (संपादक डॉ. सदानंद बोरसे, कार्यकारी संपादक विनया खडपेकर) प्रत्येक अंकाची किंमत रु.१०/–वा. व रु.१५०/– मासिकाने जाने. २०१३ च्या अंकाबरोबर पाचव्या वर्षात पदार्पण केलेला आहे. मासिकाचे सारे अंक दर्जेदार असतात. वाचकांनी त्याचे अवश्य वर्गणीदार व्हावे. आभार.

### आणखी तीन पुरस्कार प्राप्त पुस्तके

फेब्रु. २०१३ च्या अंकात तीन पुरस्कार प्राप्त पुस्तकांची व त्यांच्या लेखकाची माहिती प्रसिद्ध झाली आहे. ती अशी –

१) कविवर्य कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांच्या निधनानंतर त्यांच्या जीवनावर त्यांचे बंधू केशवराव शिरवाडकर यांनी लिहिलेले ‘तो प्रवास सुंदर होता’ हे पुस्तक राजहंस ने २००१ मध्ये प्रकाशित केले होते. डॉ. विद्या चिटको (८, यमाई, अक्षर सोसा. समर्थ नगर, नाशिक–४२२००५, फोन – ०२५३–२३५२१८९) यांनी त्याचा ‘यह यात्रा सुखद रही’ या नावाने हिंदी अनुवाद केला. या पुस्तकासाठी केंद्रीय हिंदी निदेशालयातर्फे हिंदी तर भाषी हिंदी लेखक पुरस्कार योजने अंतर्गत २००८ चा पुरस्कार त्यांना जाहीर झाला आहे. रोख एक लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

२) श्री. शेषराव मोरे यांच्या ‘काँग्रेसने आणि गांधीजींनी अखंड भारत का नाकारला’ या राजहंस प्रकाशित ग्रंथाला ‘महाराष्ट्र सेवा संघाचा’ (मुलुंड–प., मुंबई) ‘सु. ल. गद्रे’ साहित्यिक पुरस्कार मिळाला आहे. या पुस्तकाला वाचकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला आहे. तयामुळे या ग्रंथाची अल्पावधीत दुसरी आवृत्ती ‘राजहंस’ ने प्रकाशित केली आहे.

३) कविता महाजन यांनी लिहिलेल्या व राजहंस ने प्रकाशित केलेल्या ‘जोयानाचे रंग’ या पुस्तकास सौ. शशिकलाताई आगाशे स्मृती – २०११–१२ या वर्षाचा बालवाङ्मयाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. बुलढाणा येथील भारतीय विद्यालय परिवारातर्फे बारा वर्षांपासून हा पुरस्कार दिला जातो. या तिन्ही पुस्तकांचे लेखक व अनुवादक डॉ. विद्या चिटको यांचे अभिनंदन.

### राजहंस बुक क्लब

राजहंसची उत्तमोत्तम ग्रंथसंपदा २५% सवलतीत मिळण्यासाठी एका वर्षाची १५०/– वा. व. भरून ‘राजहंस बुक क्लब’ चे सभासद होता येते. वर्षभर ‘राजहंस ग्रंथवेध’ मासिक सप्रेम भेट म्हणून पाठविले जाते.

### दर्जेदार पुस्तकांची निर्मिती

राजहंस प्रकाशनाची सर्व पुस्तके दर्जेदार असतात. हे सर्व वाचकांना माहीत आहेच. नुकतीच प्रकाशित झालेल्या दोन पुस्तकांची माहिती फेब्रु.२०१३ मुखपृष्ठावर व मलपृष्ठावर दिली आहे ती अशी :–

१) 'मनगंगेच्या काठावर' (ले. सविता गोस्वामी – अनु. सविता दामले) ही आहे. कर्तबगार पत्रकार स्त्रीची खरीखुरी जीवनगाथा. सविता गोस्वामी यांची आत्मकथा दुभंगलेल्या व्यक्तिमत्वाच्या पती, पदरात दोन छोट्या मुली, दुरावलेलं माहेर अन दुखावणारं सासर, अस्तित्वाच्या, कुटुंबाला सावरण्यासाठी ही एकटी बाई कणखरपणे उभी राहिली. पत्रकारितेच्या क्षेत्रात उतरली. त्यावेळी सभोवतीचा आसाम पेटलेला होता. आंदोलन, उल्का आणि गणपरिषदेच्या चळवळी, दहशतवाद्यांच्या हिंसक कारवाया यांच्या ज्वाळा भोवती धडधडत होत्या. हा सारा वणवा, त्याचं विवेचन, त्याचे संभाव्य परिणाम यासंबंधी नामवंत वृत्तसंस्थांसाठी त्यांनी केलेलं लिखाण म्हणजे आसामची चार दशकांची बखरच. समस्यांनी भरलेलं व्यक्तिगत आयुष्य आणि राजकीय, सामाजिक उलथापालथींनी भरलेला आसाम यांच्या दुहेरी पेडांनी विणलेली आत्मकथा.

२) 'माकाम' – (रिटा चौधरी अनु. विद्या शर्मा) – किंमत ३००/– ट.ख ३०/–

ते भारतात आले दीडशे वर्षांपूर्वी. चहाच्या मळ्यात राबायला त्यांना फसवून आणले होतं. या परक्या जमिनीत त्यांनी स्वतःला रुजवलं, वाढवलं. या देशालाच आपला अन इथल्या माणसांना आप्त मानलं.

१९६२ च्या भारत–चीन युद्धामुळे ससेहोलपट झालेल्या, पुन्हा देशोधडीला लागलेल्या भारतातील चिनी वंशाच्या जनसमूहाची करुण कहाणी. आणखी काही वाचनीय व संग्राह्या पुस्तके :–

'माझी कहाणी' (पार्वतीबाई आठवले) पृ.९४, किंमत १००/– ट.ख ३०/–, 'ओळख पक्षिशास्त्राची' (डॉ. उमेश करंबळेकर) आ. दुसरी, पृ. १६४, किंमत रु.१६०/– ट ख ३०/–, 'पारधी' (गिरीश प्रभुणे) आवृत्ती ४ थी पृ.४०२, किंमत ३००/– ट ख ३०/–, (समाजाने वेशीबाहेर ढकललेल्या स्वातंत्र्यापासून आजही वंचित राहिलेल्या एका अन्यायग्रस्त जमातीची ही आक्रोश कथा. त्या जमातीच्या उत्कर्षासाठी झटणाऱ्या एका तळमळीच्या कार्यकर्त्याने मांडलेली कैफियत).

**लोकराज्य मासिकाचा फेब्रुवारी २०१३ चा संग्राह्य मराठी भाषा विशेषांक**

लोकराज्य (मुख्य संपादक प्रमोद त्र्यं नलावडे संपादकीय पत्ता माहिती व जनसंपर्क महासंचनालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळमजला, मंत्रालय, मुंबई – ४०००३२. फोन नं. ०२२– २२८८२८८८; वर्गणीदार व तक्रार निवारण्यासाठी संपर्क – ०२२ – २२०२१५३०, वितरण संपर्क – ०२२– २२०२३९५७, किरकोळ अंक रु १०/– व रु. १००/– मासिकाचा फेब्रुवारी २०१३ चा अंक मराठी भाषा विशेषांक म्हणून प्रसिद्ध झाला आहे.

भारतात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठी भाषेचा चौथा क्रमांक आणि जगात दहावा क्रमांक लागतो. वैभवशाली वारसा लाभलेली मराठी भाषा विसाव्या शतकांत अनेक प्रवाहांना आपल्या मध्ये सामावून घेत आधिक समृद्ध झाली आहे. एकविसाव्या शतकात ती आधुनिकतेचा बाज घेऊन अधिक व्यापक होत आहे.

**या विशेषांकाचे अंतरंग**

६६ पृष्ठांच्या या विशेषांकात 'लाभले आम्हांस भाग्य' हे उल्लेखनीय संपादकीय आणि डॉ. सुरदेश पांडे (शोध प्राचीनत्वाचा) प्रा. नवनीत देशमुख (साहित्यिक यशवंतराव) डॉ. सुनीलकुमार लवटे (महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित), डॉ. अशोक सोलनकर (मराठी भाषेची अभिवृद्धी डॉ. रा. श्री. मोरवंचीकर (मराठीच्या माहेरी तीर्थस्तंभ) इ. अनेकांचे सुंदर व माहितीपूर्ण लेख आहेत. राज्य मराठी वाङमय पुरस्कार (२०१०–२०११) विजेत्यांची यादी दिलेली आहे. याशिवाय या अंकात मौलिक व संग्राह्य

अशी माहिती इतर अनेक लेखांतून दिलेली आहे. मराठीच्या अभ्यासकांना, मराठी भाषकांना अत्यंत उपयुक्त अशी माहिती ही त्यांत दिलेली आहे त्यापैकी काही अशी –

**१) अंतरंग**

ज्ञानभाषेकडे वाटचाल – जगभरात संगणकाची भाषा ही ज्ञानभाषा समजली जाते. या दृष्टीने सर्व संगणकीय व्यवहार युनिकोड प्रमाणित करुन व संगणकाचे मराठीकरण करुन राज्यशासनाने मराठीला ज्ञानभाषा बनविण्याचा निर्धार केला आहे.

अभिजात मराठी – सव्वा अकरा कोटी लोकांची ही भाषा आहे. संपन्न ज्ञानभाषा असणारी मराठी महानुभवाची धर्मभाषाही आहे. मराठी राजभाषा असणारे सातवाहन राष्ट्रकुट आणि मराठे हे राज्यकर्ते भारतभर राज्य करीत होते. आजच्या पाकिस्तान बांगला देश आणि अफगाणिस्तावरही मराठी सत्तेची पताका फडकत होती. ही भाषा बोलणारे लोक आज जगातील ७२ देशांत पसरलेले आहेत. ही फक्त एका प्रांताची भाषा नसून ती महत्त्वाची राष्ट्रीय भाषा आहे.

आपली भाषा आपली अस्मिता – नोव्हेंबर २०१० मध्ये मराठी भाषा विभागाची स्थापना करण्यात आली. विभागाच्या अधिपत्याखाली भाषा संचनालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्था या चार संस्था कार्यरत आहेत. या विभागांमार्फत भाषा संवर्धनासाठी अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

भाषा वैभव – भाषा संचालनालयाच्या प्रकाशनांना जनतेकडून प्रचंड मागणी आहे. भाषा संचालनालयाच्या काही पुस्तकांचा परिचय देण्यात आला आहे.

२. बोलावे मराठी – भाषा हे केवळ संवादाचे माध्यम नसून ते संस्कृती आणि अस्मितेचं प्रतीक असते. आपली मराठी भाषा ही केवळ आपली राज्यभाषा नाही. तर आपल्या सांस्कृतिक वैभव आणि महाराष्ट्रीय माणसाचा मानबिंदू आहे. मराठी भाषेच्या विकासातच या राज्याचा सर्वांगीण विकास सामावलेला आहे त्यामुळे मराठी भाषेचा विकास ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

**मराठीतील पुस्तके आणि संमेलने**

मराठीत दरवर्षी सुमारे दोन हजार पुस्तके प्रकाशित होतात. सुमारे पाचशे दिवाळी अंक निघतात. आणि छोटी मोठी सुमारे दोनशे साहित्य संमेलने होतात. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला लाखो रसिक उपस्थिती लावतात. दरवर्षी कोट्यवधी रुपयांची पुस्तकांची विक्री होत असते. नामवंत खासगी प्रकाशन संस्था आणि सरकारी प्रकाशने यांची वैचारिक आणि ललित पुस्तकांची वार्षिक उलाढाल वीस ते २५ कोटीपर्यंत असून पाठ्यपुस्तके, धार्मिकग्रंथ, पाककृती, व्यक्तिमत्त्व विकास विषयक तसेच ललित आणि वैचारिक ग्रंथ यांची एकत्रित बाजारपेठ सुमारे २५० कोटी रु आहे. देशातील एकूण ग्रंथालयांपैकी २५ टक्के ग्रंथालये एकट्या महाराष्ट्रात आहेत. मराठीत जेवढे कोशवाङ्मय आहे तेवढे भारतातील अन्य कोणत्याही भाषेत नाहीत. ज्ञानेश्वर, तुकारामांवरून शेकडो नोबेल ओवाळून टाकावीत असे जागतिक दर्जाचे श्रेष्ठ लेखन मराठीत झालेले असून मराठी भाषेत आजवर सुमारे एक लाख ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. त्यांतील असंख्य ग्रंथ वैश्विक दृष्ट्या श्रेष्ठ ठरावेत असे आहेत.

मराठी भाषा – विद्यमान मराठी आधी महाराष्ट्री अपभ्रंश व त्याही आधी महाराष्ट्री प्राकृत या भाषा प्रचारात होत्या. महाराष्ट्री प्राकृत ही भारतातील सर्व प्राकृत भाषांमध्ये सर्वाधिक महत्वाची मानली जात होती. त्याकाळी लेखक कोणत्याही प्रदेशातला असला तरी ललित लेखनासाठी महाराष्ट्री प्राकृताचाच स्वीकार केला जात असे. साहजिकच प्राकृताची क्षेत्रमर्यादा केवळ महाराष्ट्र

ही नव्हती तर त्याहून व्यापक प्रदेशात तिचा संचार होता. प्राचीन महाराष्ट्रातील साहित्य सृष्टीकडे नजर टाकल्यास एका मोठ्या परंपरेचे दर्शन घडते. मराठी भाषेत उत्तम प्रतीचे वाङ्मय तेराव्या शतकात निर्माण झाले. पण त्यापूर्वी या भूभागात राहणाऱ्या अनेकांनी संस्कृत – प्राकृत अपभ्रंश भाषांत वाङमयनिर्मिती केली. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कविकुलगुरू कालिदास होय. त्याने मेघदूताची निर्मिती रामगिरी येथे केली. मच्छकटिकाचा निर्माता शूद्रक हा महाराष्ट्रीय होता. ‘दशकुमाररचित कर्ता हाही मूळचा महाराष्ट्रीय मानला जातो. प्रसिद्ध ज्योतिषी व गणिती भास्कराचार्य हाही महाराष्ट्रीय होता. याचा अर्थ असा की प्रत्यक्ष मराठी भाषेत प्रौढ स्वरूपाची ग्रंथरचना सुरु होण्यापूर्वी महाराष्ट्रातील पूर्वकवींनी मोठ्या प्रमाणात ग्रंथनिर्मिती करून लौकिक मिळविला होता. पूर्वकवींनी मोठ्या प्रमाणात ग्रंथनिर्मिती करून लौकिक मिळविला होता. पूर्वसुरीच्या या ग्रंथाचा काही एक परिणाम यादवकालीन मराठी लेखकांवर निश्चितपणे झाला असला पाहिजे, महानुभाव व वारकरी पंथातील कवींनी गाठलेल्या वाङ्मयीन उंचीला त्याआधीची चार पाचशे वर्षांची परंपरा कारणीभूत ठरली.

अशी आहे मराठी भाषेची अगाध महती. म्हणूनच ज्ञानोबा माऊली तीचे वर्णन करतात.

जैसे दीपांमाझी दिवटी।
कां तिथीमाझी पूर्णिमा गोमटी।
तैसी भाषांमध्ये मऱ्हाटी सर्वोत्तम।।

आणि संतश्रेष्ठ तुकोबा म्हणतात–

आम्हां घरी धन शब्दाची च रत्ने।
शब्दांची च शस्त्रे याने करु।।
शब्दची अमुच्या जीवाचे जविन।
शब्द वाटू धन जनलोका।।

प्रत्येक मराठी माणसाने हा विशेषांक वाचावाच संग्रही ठेवावा आणि महाराष्ट्रातल्या सर्व ग्रंथालयांनी तो आपापल्या ग्रंथालयांसाठी घ्यावा. धन्यवाद !

**एक अभ्यास शिवदैवताचा**
**(एका अभ्यासपूर्ण पुस्तकाचा परिचय)**

शिव हे हिंदूचे एक अत्यंत प्राचीन असे वंदनीय उपास्यदैवत आहे. हे दैवत आध्यात्मिक दृष्ट्या अतिशय उच्च आहे. पण तितकेच ते सर्वसामान्य जनांत लोकप्रियही आहे. अशा या शिवदैवतांचा सर्वांगीण अभ्यास शरदश्चंद्र मनोहर भालेराव यांनी केला व त्याचेच पुस्तक केले (पृ.११६, मूल्य रु.१००/–) ‘ग्रंथाली’ (इंडियन एज्युकेशन सोसायटीची म.फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, ऑफ गोखले रोड (उ.), दादर, मुंबई–४०००२८, फोन नं.०२२/२३८७५४८१ ने ५.७.२००४ रोजी प्रसिद्ध केले आहे.

**लेखकाचा परिचय**

कै.श.म.भालेराव हे प्रकांड पंडित होते. ते महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागात अभियंता होते.त्यांचा जन्म २.३.१९२६ रोजी झाला. व मृत्यू ९.२.२००६ रोजी झाला. प्रचंड बुद्धिमत्ता आणि अभ्यासवृत्ती आणि सतत कार्यरत रहाणे ही त्यांची वैशिष्ट्ये. ‘मातीची धरणे’ या नावाची पुस्तिका १९५५ मध्ये लिहिली. मराठीतून शास्त्रीय विषय यथार्थपणे व्यक्त करता यावेत याचा त्यांना सतत ध्यास असे. त्या दृष्टिकोनातून थिएट्रीकल सॉईल मेकॅनिक्स या के. तेरझागी यांच्या प्रमाण ग्रंथाचा मराठी अनुवाद ‘सैद्धान्तिक मृत्तिका बलाविज्ञान’ या नावाने प्रसिद्ध केला. प्रस्तुतचे ‘एक अभ्यास शिवदैवताचा’ हे सुंदर पुस्तक २००४ साली लिहिले. (त्याचा इंग्रजी अनुवाद त्यांनीच केला.) याशिवाय प्रसाद मासिकांत नद्यांच्या ऐतिहासिक माहिती देणारे अनेक लेख प्रसिद्ध केले. मराठी भाषेसाठी त्यांचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे सतत वीस वर्षे प्रचंड

मेहनत घेऊन तयार केलेला भारतीय सरिता कोश तीन खंडांमध्ये प्रसिद्ध झालेल्या या कोशाची एकूण पृष्ठे ४८२७ + नकाशे आहेत. दत्तात्रय ग्रं. पाष्टे यांच्या डायमंड पब्लिकेशन्स (१६९१, सदाशिव पेठ, शंकरप्रसाद बिल्डिंग, ग्राहक पेठेजवळ, टिळक रोड, पुणे-४११०३०, फोन नं.०२०-२४४५२३८७) या प्रख्यात संस्थेने तो प्रकाशित केलेला आहे. संस्थेचे आजवर सुमारे ७५ कोश प्रसिद्ध केलेले आहेत.

**'एक अभ्यास-शिवदैवताचा' ची वैशिष्ट्ये**

आपल्या मनोगतात कै. शं.म. भालेराव म्हणतात, 'भारतीय नद्यांची विस्तृत माहिती संग्रहित करण्याच्या माझ्या मूळ कामाला फुटलेला, शिवदैवताचा अभ्यास हा अनपेक्षित फाटा आहे. नदीविषयक अद्भुतरम्य कथा हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. काही महत्त्वाच्या नद्यांतून शिवाचा संदर्भ येतो. उदाहरणार्थ, विख्यात गंगावतरणाच्या कथेत शंकराने स्वर्गातून येणारी गंगा प्रथम आपल्या मस्तकी धारण केली व नंतर खाली सोडली. नर्मदा तर शिवकन्याच आहे. भीमेविषयीच्या कथेत शिव आहे हे पाहिल्यावर नदीसारख्या पूर्णपणे ऐहिक किंवा प्राकृतिक विषयाशी शंकराचा संबंध का यावा याविषयी कुतूहल जागृत झाले. त्यामागचे वास्तव काय असावे? असा प्रश्न पुढे ठाकला. त्यातून या दैवताचा अभ्यास करण्याची बुद्धी झाली. अर्थात हा अभ्यास वैज्ञानिक किंवा प्राकृतिक स्वरुपाचा आहे. आध्यात्मिक स्वरूपाचा नाही.

या अभ्यासासाठी वेद-पुराणांचा मागोवा घेणे आवश्यक होते. त्याचबरोबर पदार्थ विज्ञान, ज्योतिर्विज्ञान, भूगर्भशास्त्र इ. आधुनिक शास्त्रांचा अभ्यास करणेही आवश्यक झाले; कारण अभ्यास करताना असे दिसून आले की शिवतत्वाचे खरे रूप ज्वालामुखी उद्रेकजन्य हे आहे. अर्थातच, ज्वालामुखीचा उद्रेक या नैसर्गिक घटनेशी भारताच्या संदर्भात माहिती करुन घेणे आवश्यक ठरते.

**प्रा. हे. वि. इनामदार यांचा अभिप्राय**

'एक अभ्यास-शिवदैवताचा' हा आपला प्रकल्प मी बारकाईने वाचला. प्रकल्प मला मनोमन आवडला. एका वेगळ्या पण महत्त्वाच्या विषयावर आपण उत्कृष्ट लेखन केले आहे. 'सर्वज्ञः सहि माधवा' मध्ययुगांत माधवाचार्य हे बिजगनपर साम्राज्यांतील एक महान पंडित होते. त्यांच्या प्रज्ञेला विषय नव्हता. त्यामुळे त्यांच्या संबंधी हे वचन म्हटले जाई. अनेक ज्ञानशाखांत ज्यांना उत्तम गती होती असे काही विद्वज्जन आजही कुठेकुठे आहेत. शरदश्चंद्र मनोहर भालेराव यांची गणना अशा पंडित वर्गात करता येईल.

**उत्कृष्ट परिशिष्टे**

'ऋग्वेदातील ज्वालामुखीविषयक ऋचा, 'शिवस्थाने', 'शक्तिपीठे' आणि नदीमार्गावरची शिवस्थाने ही चार परिशिष्टे यांतून अत्यंत मौलिक माहिती दिलेली आहे. याशिवाय २३ संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे. (त्यांत ऋग्वेदाचे मराठी भाषांतर - म.म.विद्यानिधी सिद्धेश्वर शास्त्री चित्राव, 'सार्थ श्री वाल्मिकि रामायण'- प्र. न. जोशी भारतीय संस्कृति कोश ( खंडा १ ते १०) प. महादेवशास्त्री जोशी, वैदिक आर्यांचे मूलस्थान -लो. बाळ गंगाधर टिळक ३३ अनेक महान ग्रंथकर्त्यांच्या मौलिक ग्रंथांची नावे आहेत. अभ्यासकांना हे सारे अत्यंत उपयुक्त आहे. जाणकार व अभ्यासू वाचकांनाही हा ग्रंथ खूप आवडेल. एका अत्यंत मौलिक ग्रंथांची रचना केल्याबद्दल कै. श. म. भालेराव यांच्य स्मृतीला प्रणाम व तो प्रकाशित केल्याबद्दल 'ग्रंथाली'चे मनःपूर्वक अभिनंदन!

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●

अनुभवाने ज्ञानाला व चित्ताला एक प्रकारचे स्थैर्य येते.

# परिसर वार्ता

**– संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम प्राथमिक विभाग

**२०१२ – २०१३ च्या बालवीर राज्य पुरस्काराचा निकाल : १००%**

राज्य पुरस्कार मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे

बालवीर

१) कु. साहिल भागवत
२) कु. अभिषेक पाटिक
३) कु. आदेश छेडा
४) कु. विनित मोरे
५) कु. हिमांशू चाचड
६) कु. ओंकार महाडिक
७) कु. पार्थ गुप्ता
८) कु. निशांत फाटक
९) कु. ओंकार सुर्वे
१०) कु. गीत म्हात्रे
११) कु. ओंकार डेरे
१२) कु. सोहम जाधव
१३) कु. रोहित कोळेकर

**कन्स्युमर क्लब आयोजित विविध स्पर्धेंचा निकाल**

निबंध स्पर्धा : प्रज्ञा घारपुरे – प्रथम क्रमांक
गायत्री मुकादम – द्वितीय क्रमांक
चित्रकला स्पर्धा: शिवानी पिसाट – तृतीय क्रमांक
साक्षी वैद्य – उत्तेजनार्थ
आकांक्षा राडे – उत्तेजनार्थ
घोष वाक्य स्पर्धा : रिचा पार्टे – उत्तेजनार्थ

आपल्या शाळेच्या क्रिकेट संघाने घंटाळी देवी क्रिकेट क्लब आयोजित १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत उपविजेते पदाचा चषक पटकावला. वसंत विहार शाळेविरुद्ध झालेल्या सामन्यात, हर्षल वेलिंग याने ७५ धावा काढल्या व राहूल सुर्यवंशी याने तीन गडी बाद केले. तसेच हर्षल वेलिंग ह्याला 'बेस्ट ऑल राऊंडर' हा चषक मिळाला.

ब्राह्मण सभा, ठाणे यांच्यातर्फे गणपती अथर्वशीर्ष पाठांतराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात ४ थी च्या विद्यार्थीनींनी पुढीलप्रमाणे क्रमांक पटकावला

१) कु. जान्हवी सिद्धेश्वर नातू – इ. ४ थी (दुसरा क्रमांक)
२) कु. केतकी मारुती धर्माधिकारी – इ. ४ थी (तिसरा क्रमांक)

दि. २६ फेब्रुवारी रोजी इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांनी मराठी दिन उत्साहात साजरा केला. मराठी दिनाचे महत्त्व व तो साजरा करण्यामागचे कारण त्यांना या दिवशी सांगण्यात आले व मराठीतून अभंग, श्लोक, कविता, गाणी म्हटली तसेच मराठीतील नामवंत लेखक व कविंचे स्मरण करून त्यांची काव्ये व विनोद तसेच त्यांच्या लेखनातील म्हणी व वाक्प्रचारांचा उल्लेख आपल्या कार्यक्रमात केला. मराठी भाषा आज जरी महत्त्वाची मानत नसले तरी तीच्यातील गोडवा, आपलेपणा तसेच इतर भाषातील शब्दांना आपले करून पुढे चालण्याची मराठीची परंपरा मुले चालवतील अशी त्यांनी शपथ घेतली.

जिम्नॅस्टिक फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने आयोजित केलेल्या ज्युनिअर नॅशनल जिम्नॅस्टिक चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये कु. ऋचा विवेक देवळे (इ. ३ री) हिने कास्य पदक पटकावले. ही स्पर्धा हरियाना येथे आयोजित केली होती.

हिंदुस्तान कला व संगीत सोसायटी, ब्रद्वान, वेस्ट बेंगाल आयोजित भारतीय शास्त्रीय संगीत, नृत्य, लोकनृत्य आणि नाट्यस्पर्धा व उत्सवमध्ये कु. हिमानी कद्रेकर हिने प्रथम पुरस्कार पटकाविले.

## बांदोडकर विज्ञान विद्यालय

### मराठी भाषा दिवस

कविवर्य कुसुमाग्रजांच्या वाढदिवसानिमित्त २७ फेब्रुवारी २०१३ रोजी मराठी भाषा दिवस साजरा करण्यात आला. यावेळी ग्रंथालयात विद्यार्थ्यांनी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक व थोर मराठी संत अशा दोन भित्तिपत्रिका तयार केल्या होत्या. यावेळी यशवंतराव चव्हाण यांच्यावरील पुस्तकांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. तसेच ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या लेखकांच्या पुस्तकांचे प्रदर्शने देखील भरवण्यात आले होते.

निबंधस्पर्धा, हस्ताक्षरस्पर्धा, शुद्धलेखनस्पर्धा, काव्यस्पर्धा, कविता वाचनस्पर्धा, मराठी प्रतिशब्दस्पर्धा अशा विविध स्पर्धा मराठी विभागातर्फे घेण्यात आल्या होत्या व मराठी दिवसाचे निमित्त साधून यांतील पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

यदाकदाचित, लोच्या झाला रे इत्यादि नाटकांद्वारे रंगभूमी गाजविणारे विनोछी नट श्री. मंदार गायधनी यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शेवटी आभार प्रदर्शन प्रा. बिपिन धुमाळे यांनी करून सर्वांनी राष्ट्रगीत गाऊन या कार्यक्रमाची सांगता झाली.

### राष्ट्रीय विज्ञान दिवस

विज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी राष्ट्रीय विज्ञान दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला. सायन्स स्क्वेअर आणि ग्रंथालय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पतंजली सभागृह आणि पतंजली योग केंद्रामध्ये दि.२८ फेब्रुवारी २०१३ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत पोस्टर प्रझेंटेशन आणि भित्तिपत्रिकांचे प्रदर्शन हे उपक्रम सामाविष्ट होते. सोबतच आजवर मोलाची कामगिरी बजावलेल्या अनेक महान वैज्ञानिकांच्या पुस्तकांचे प्रदर्शनही भरवण्यात आले होते. कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्रीयुत एच. बी. काटकर यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

सायन्स स्क्वेअरच्या संयोजिका डॉ. पूजा जगसिया यांनी त्यांच्या उद्घाटनपर भाषणातून मुलांना राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व समजावून दिले. तर माहिती आणि तेत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या अभिनयाच्या जोरावर ऐक छोटेखानी सिनेमाच सादर केला. तंत्रज्ञानाची झपाट्याने होणारी प्रगती हा त्यांचा मुख्य हेतू त्यांनी त्यांच्या कलेतून सादर केला.

वनस्पतिशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. मोझेस कोलेट यांनी मुलांशी मुक्त संवाद साधला. यावेळी त्यांनी मुलांना संशोधनाचे महत्त्व पटवून दिले. आणि त्यांनी छोट्या छोट्या प्रयोगांत सक्रिय सहभाग घ्यावा तसेच पोस्टर प्रेझेंटेशनमध्येही आपलं कसब दाखवण्यासाठी उदयुक्त केले.

यावेळी पोस्टर प्रेझेंटेशन, भित्तिपत्रिकांचे प्रदर्शन आणि पुस्तक प्रदर्शन या उपक्रमांत सहभागी झालेल्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. १० पोस्टर्स आणि २ भित्तिपत्रिका प्रदर्शनासाठी ठेवल्या होत्या. तसेच वैज्ञानिकांच्या मराठी-इंग्रजी भाषांमधल्या पुस्तक प्रदर्शनाचाही चांगला उपयोग उपस्थितांनी करून घेतला. या कार्यक्रमात ५५ विद्यार्थी, १८ शिक्षक तसेच १५ शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

### डॉ. सौ. कुसुम गोखले यांचा सत्कार समारंभ

डॉ. सौ. कुसुम गोखले यांच्या ८० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील सर्व संशोधन मार्गदर्शक व त्यांचे

विद्यार्थी यांनी दि. १७ मार्च २०१३ रोजी त्यांचा सत्कार पाणिनी सभागृहात आयोजित केला होता.

डॉ. सौ. कुसुम गोखले या जून १९७३ मध्ये प्राणिशास्त्र विषयात व्याख्याता म्हणून रुजू झाल्या व त्या फेब्रुवारी १९९३ मध्ये निवृत्त झाल्या त्यांच्या मार्गदर्शनाखाली ०२ विद्यार्थ्यांनी एम.एस्सी., ०२ विद्यार्थ्यांनी एम.फिल व ०७ विद्यर्थ्यांनी पी.एच.डी. पदवी प्राप्त केली.

या कार्यक्रमाची सुरुवात गोखले मॅडमचे विद्यार्थी व वरिष्ठ प्राध्यापक डॉ. आठल्ये यांनी सादर केलेल्या पसायदानाने झाली. त्यांच्या बरोबरच प्राणिशास्त्र विभागाचे प्रा. राठोड व अभिजित जोशी यांनी सुंदर गाणी व कविता सादर केल्या.

महाविद्यालयाच्या प्राचार्या व गोखले मॅडमच्या विद्यार्थीनी डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी यावेळी एक छान प्रेझेंटेशन सादर केले. या प्रझेंटेशनमध्ये त्यांनी गोखले मॅडमनी पुढाकार घेऊन संशोधनाची संस्कृती कशी रुजवली याबाबतच्या महत्त्वाच्या घटना अधोरेखित केल्या.

प्राणिशास्त्र विभागाला संशोधनाकरता मान्यता मिळाल्यानंतर वनस्पतिशास्त्र व रसायनशास्त्र विभागामध्ये संशोधनाचे कार्य सुरू करण्यात आले. त्याचेच फळ म्हणून आज बांदोडकर विज्ञान महाविद्यालयामधून ५ संशोधकांना एम.फिल., ५८ संशोधकांनी पी.एच.डी. आणि १२ संशोधकांना एम.एस.सी. बाय रिसर्च पदवी प्राप्त झाली आहे व अनेक विद्यार्थी पी.एच.डी. व एम.फिलच्या प्रक्रियेमध्ये (प्रकल्प अहवाल तयार करणे व तोंडी परीक्षा) कार्यरत आहेत. डॉ. हर्डीकर व डॉ. मुखर्जी या मॅडमच्या विद्यार्थिनी व डॉ. विद्या ही पुढील पिढीतील विद्यार्थिनी यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले.

यावेळी गोखले मॅडमनी आपण मार्गदर्शन केलेले विद्यार्थी आज संशोधन क्षेत्रात मोठ्या पदावर कार्यरत आहेत व मार्गदर्शक म्हणून नवीन पिढीला संशोधनाचे पाठ शिकवीत आहेत. याबाबत समाधान व्यक्त केले. सर्व उपस्थित या दोन तासात महाविद्यालयाच्या संशोधनामध्ये झालेली प्रगती ऐकून भारावून गेले होते.

**डॉ. जी. व्ही. कुलकर्णी यांचा निरोप समारंभ**

डॉ. जी. व्ही. कुलकर्णी, संचालक, प्रगत अध्ययन केंद्र यांचा सेवा निवृत्ती समारंभ ७६ व्या वर्षी ३० मार्च २०१३ रोजी बा. ना. बांदोडकर महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागाच्या शिक्षकांतर्फे करण्यात आला. कुलकर्णी सर यापूर्वी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयामध्ये प्राणिशास्त्र विभाग प्रमुख, उपप्राचार्य आणि प्राचार्य या पदांवर कार्यरत होते. १९९६ साली बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातून प्राचार्य पदावरून सेवानिवृत्त झाल्यावर ते प्रगत अध्ययन केंद्राशी संलग्नित होते.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय ठाणे

**१. प्रात्याक्षिक परीक्षा**

दि. १ मार्च आणि दि. ४ ते ६ मार्च २०१३ दरम्यान विधी महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आल्या. या परीक्षेचे निकाल दि. २० मार्च २०१३ रोजी जाहीर करण्यात आले. सदर परीक्षेत नापास आणि गैरहजर विद्यार्थ्यांसाठी दि. २३, २५ आणि २६ मार्च रोजी पुन्हा प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आल्या. पुन्हा घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल दि. २८ मार्च २०१३ रोजी जाहीर करण्यात आला.

**२. डॉ. व्ही. एन. बेडेकर वादविवाद स्पर्धा**

दि. ९ मार्च २०१३ रोजी दरवर्षीप्रमाने डॉ. व्ही.एन. बेडेकर वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन माजी न्यायाधीश एस्. एस. देशमुख

यांनी केले. तसेच परीक्षक म्हणून निवृत्त न्यायाधीश श्री. शिर्के आणि श्री. राणे यांनी स्पर्धकांचे मूल्यमापन केले.

**Topics -**

1) Hindu Marriage Act 1955 Should be amended to specifically exclude supression Misrepresentation of caste as a ground for nulity of Marriage.
2) Public Inquiry commissions are just waste of public money.
3) Criminal law amendment ordinance 2013 can achieve its avowed object.

**Prize Winners -**

प्रथम पारितोषिक उत्कृष्ट संघ – ठाणे विधी महाविद्यालय

१) कृष्णा कामत

२) रंजनी कृष्णन्

द्वितीय पारितोषिक – के. सी. लॉ. कालेज

१) हरेंद्रपाल राणावत

२) देवेंद्र दवे

तृतीय पारितोषिक – प्रवीण गांधी लॉ कॉलेज

१) बेनजद इराणी

२) श्रद्धा मंधाना

उत्कृष्ट वक्ते – प्रथम – कृष्णा कामत – ठाणे विधी महाविद्यालय

द्वितीय – रंजनी कृष्णन् – ठाणे विधी महाविद्यालय

तृतीय – हरेंद्रपाल राणावत – के. सी. लॉ. कॉलेज

### ३) सांस्कृतिक महोत्सव

दि. १५, १६ मार्च २०१३ रोजी विधी महाविद्यालयाचा सांस्कृतिक महोत्सव 'उतुंग' आयोजित करण्यात आला होता. यामध्ये क्रीडा व कला विषयक विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

### ४) वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

दि. १७ मार्च २०१३ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे श्री. अनिल जोशी न्यायाधीश मुंबई उच्च न्यायालय हे उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार श्री. जोशी सर यांचे हस्ते करण्यात आला.

श्री. एस. व्ही. करंदीकर, ज्येष्ठ सदस्य व्ही. पी. एम. हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. त्यांच्या भाषणामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना गांभीर्याने अभ्यास करण्याचा आणि ग्रंथालय व वर्गातील शिक्षणाचा उपयोग करण्याचा सल्ला दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वत:वरती विश्वास ठेवून परिश्रम घेण्याचा सल्ला दिला. प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रा. विनोद वाघ यांनी आभार प्रदर्शन केले. सर्व कार्यक्रमाचे संचालन संकेत लेले आणि कृष्णा कामत या दोन विद्यार्थ्यांनी केले.

५) दि. २ मार्च रोजी मुंबई विद्यापीठाने आणि महाराष्ट्र अन्डर प्रिविलेज्ड टिचर्स असोसिएशन यांनी शाहीर अमरशेख सभागृहामध्ये "Guidelines for Implementation of Roster" या विषयावरती कार्यशाळेचे आयोजन केले होते. डॉ. पी. एस्. मीना आ. ए. एस.एडी. चीफ सेक्रेटरी GAD, महाराष्ट्र सरकार यांनी मार्गदर्शन केले. प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार आणि कनिष्ठ लिपिक सौ. रंजन करंदीकर यांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदविला.

६) दि. ८ मार्च २०१३ रोजी consultation on Anti-Rape Laws & Policy या विषयावर परिसंवादाचे आयोजन मुंबई विद्यापीठातील कॉनव्होकेशन हॉलमध्ये करण्यात आले होते. विधी विभाग आणि ग्लोबल व्हीजन इंडिया फाऊंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास

सौ. श्रीविद्या जयकुमार उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन मुख्य न्यायाधीश मुंबई उच्च न्यायालय यांनी केले.

७) दि. २४ मार्च २०१३ रोजी निरंजन डावखरे एम.एल.सी. आणि समन्वय प्रतिष्ठान यांनी Youth on Competitive Examinations for Public Servies या विषयावरती चर्चासत्राचे आयोजन एन. के. टी. कॉलेज, ठाणे येथे केले होते. प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार यांना भारतीय संविधानावरती भाषण देण्यासाठी बोलविण्यात आले होते.

८) दि. ३० मार्च २०१३ रोजी विधी महाविद्यालयात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी मुलाखती घेण्यात आल्या. त्यामधून ग्रंथालय परिचर पदासाठी १ एस.सी व १ एस.टी. अशा दोन उमेदवारांची नेमणूक करण्यात आली.

९) दि. ३० मार्च २०१३ रोजी मुंबई विद्यापीठातील विधी विभागाने आयोजित केलेल्या एम.सी. छागला लेक्चर सिरीजमधे सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश श्री. काटजू यांनी Ancient India Jurisprudence & Modern Jurisprudence या विषयावर व्याख्यान दिले. द्वितीय वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांबरोबर प्रा. मिथुन बनसोडे यांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

## तंत्रनिकेतन वार्ता

### वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनच्या 'इनोव्हिजन' या वार्षिकाचे प्रकाशन आणि बक्षिस वितरण सोहळा

वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनच्या 'इनोव्हिजन' या वार्षिकाचे प्रकाशन शनिवार दि. १६ मार्च २०१३ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत तंत्रनिकेतनच्या ए. व्ही. रुम येथे मा. श्री. ए. के. बीडकर (माजी संचालक, तंत्रशिक्षण, गोवा) यांचे शुभहस्ते करण्यात आले. वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य डी. के. नायक यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास माजी प्राचार्य एस. एस. मुजुमदार, तंत्रनिकेतनच्या विविध विभागांतील विभाग प्रमुख शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांच्या व मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्ज्वलन करण्यात आले. त्यानंतर ईशस्तवन गायले. प्राचार्य डी. के. नायक यांनी प्रमुख पाहुण्याचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. 'इनोव्हिजन' संपादिका सौ. वैशाली सोनावणे यांनी स्वागतापर भाषण केले.

माजी प्राचार्य एस. एस. मुजुमदार यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. दरम्यान कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य दि. कृ. नायक यांनी उत्तम आणि सुंदर शब्दात सादरीकरण करून आपले मनोगत व्यक्त केले. दरम्यान प्रमुख पाहुण्यांच्या व मान्यवरांच्या हस्ते २०१२-१३ 'इनोव्हिजन' या वार्षिकाचे प्रकाशन करण्यात आले. प्रमुख पाहुणे श्री. ए. के. बीडकर यांनी आपले मनोगत सुंदर व मोजक्या शब्दात व्यक्त केले. दरम्यान प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसे वितरीत करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना प्रा. सौ. कीर्ती अगाशे आणि मुजुमदार सरांच्या गायनाचा लाभ झाला. आभार प्रदर्शन सौ. बी. ए. जोशी यांनी व्यक्त केले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

### राष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान संमेलन २०१३
### National IT Summit 2013

डॉ. व्ही. एन. ब्रीम्समध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या विविध विषय शाखांच्या संमेलनांपैकी माहिती तंत्रज्ञान विषयाचे राष्ट्रीय संमेलन या वर्षी ''व्यावसायिक/ व्यवसायातील उभरत्या माहिती तंत्रज्ञान पद्धती'' (**Emerging IT Practices in Business**) या विषय सूत्रावर आयोजित करण्यात आले. झपाट्याने बदलणारे तंत्रज्ञान आणि नव्या व्यावसायिक संकल्पना यांच्या

संयोगातून तयार झालेल्या Cloud Computing, BYOD (Bring Your Own Device), MDM (Mobile Device Management) या काही उभरत्या माहिती तंत्रज्ञान पद्धती असून या पद्धतींबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी तसेच या पद्धतींवर चर्चा करण्यासाठी या क्षेत्रातील अनुभवी व तज्ज्ञ व्यक्तींना यावेळी आमंत्रित करण्यात आले.

संमेलनाची सुरुवात डॉ. के. सुर्यनारायणन यांच्या उद्धाटनपर भाषणाने झाली. वेगाने बदलणाऱ्या आजच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात बरेचदा आज जे योग्य आहे ते लवकरच निरुपयोगी ठरते. म्हणूनच या विषयाची नवनवीन माहितीबद्दल सतत जागरुक राहून ती जाणून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

डॉ. पी. एम. केळकर (अधिष्टाता, डॉ. व्ही. एन. ब्रीम्स) यांनी देखील संमेलनाच्या विषय सूत्रासंदर्भात आपले मत व्यक्त केले व माहिती तंत्रज्ञान हा आजच्या व्यवसायाचा मुख्य आधार असल्याने त्याचा योग्य उपयोग व्यवसायसाठी फायदेशीरच ठरतो असे यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. राजन अनंतनारायणन (Vice President & Reliance Industries Limited ) यांनी **Emerging IT Practices in Business** या विषयाबद्दल आपली मते मांडली. पूर्वीच्या **(IT)** माहिती तंत्रज्ञान अधिकाऱ्याला आता (ICT) माहिती संप्रेषण तंत्रज्ञान अधिकारी म्हणून कार्य करावे लागते कारण विविध प्रकारच्या उपकरणांच्या सहाय्याने विविध व्यक्तींच्या संपर्कात राहणे हा त्याच्या रोजच्या कार्यपद्धतीतील महत्त्वाचा भाग असतो असे त्यांनी सांगितले. तसेच या क्षेत्रातील १९९८ ते २०१३ या कालावधीतील साधा संगणक (Desktop PC) ते आताचे स्मार्ट फोन पर्यंतचा प्रवास आणि या उपकरणांचे व्यवसाय क्षेत्रात होणारे फायदे; त्यामुळे कार्यपद्धतीमध्ये होणारे बदल, त्यांचे परिणाम इत्यादींबाबत माहिती त्यांनी आपल्या भाषणात सांगितली.

त्यानंतर श्री. प्रशांत माळी यांनी (President & Cyber Law and Cyber Security Firm) यांनी **"Cloud Computing Security & Law"** या विषयावर व्याख्यान दिले. Cloud Computing चे विविध प्रकार त्याचे उपयोग, तसेच विशेषतः लघु उद्योगांसाठी Cloud Computing कसे कमी खर्चाचे आणि जास्त उपयोगाचे ठरते इत्यादी बाबत त्यांनी माहिती दिली तसेच Cloud Computing च्या सेवा वापरतांना उदभवणारे संभाव्य धोके, जोखिम, योग्य सेवेची निवड, परवाना कराराचे महत्त्व अशा अनेक मुद्यांबाबत त्यांनी उपयुक्त माहिती दिली तसेच रोजच्या इंटर नेट वापराबाबत किंवा संकेत स्थळावरून माहिती download करताना अनावधानाने किंवा निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या चुका, त्या संबंधीचे कायदे नियम याबद्दल ही यांनी विद्यार्थ्यांना अनेक उदाहरणांद्वारे उपयुक्त माहिती दिली.

त्यानंतर श्री. रितेश इंगळे (Global Manager - Tata Consultancy Services) यांनी **"BYOD practices in business"** BYOD (Bring Your Own Device) या व्यवसाय क्षेत्रात नव्याने वापरात येत असलेल्या या पद्धतीबद्दल माहिती सांगितली. ही पद्धती वापरण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पूरक पायाभूत सुविधा, कर्मचारी वर्गाला होणारा फायदा, वेळेची आणि पैशाची बचत इत्यादी बाबत विविध उद्योग संस्थांची मते या संदर्भातही माहिती त्यांनी दिली. CISCO या संस्थेने २०१२ मध्ये BYOD संदर्भात केलेल्या सर्वेक्षणाच्या निष्कर्षबद्दलची माहिती देखील त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितली.

त्यानंतर झालेल्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**Live Screening of Union Budget 2013-14**
**अर्थसंकल्प २०१३–२०१४ थेट प्रक्षेपण**

डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

आणि WIRC of the Institute of Chartered Accountants of India (ठाणे शाखा) यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षीही अर्थसंकल्प २०१३-२०१४ थेट प्रक्षेपण आणि तज्ज्ञांची प्रतिक्रिया अशा कार्यक्रमाचे आयोजन पाणिनी सभागृहात करण्यात आले. या प्रसंगी औद्योगिक क्षेत्रातील अर्थतज्ज्ञ, ज्ञानद्वीप मधील इतर महाविद्यालयांतील शिक्षक आणि विविध शाखांचे विद्यार्थी ही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. के. सूर्यनारायणन यांच्या स्वागत पर भाषणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि त्यानंतर विशेषतः विद्यार्थ्यांनी अर्थसंकल्प कशाप्रकारे अभ्यासावा किंवा अर्थसंकल्प कसा जाणून घ्यावा या हेतूने सहा.प्राध्यापिका स्मिता जपे यांनी अर्थसंकल्पाची आखणी कशी असते तसेच समग्र आर्थिक निर्देशांक या विषयावर, तर सहा.प्राध्यापिका शैलजा यादव यांनी आर्थिक सर्वेक्षणातील महत्वाचे मुद्दे आणि रेल्वे अर्थसंकल्प २०१३-१४ मधील महत्वाचे मुद्दे या विषयावर तसेच सहा. प्राध्यापिका CA पूनम मुळये यांनी प्रत्यक्ष कर आणि नव्या अर्थसंकल्पा संदर्भात अपेक्षा या विषयावर विवेचने सादर केली.

त्यानंतर अर्थसंकल्प २०१३-२०१४ थेट प्रक्षेपण प्रक्षेपित करण्यात आले.

प्रक्षेपण संपल्यानंतर झालेल्या अर्थसंकल्प २०१३-२०१४ प्रतिक्रिया सत्रात चार्टर्ड अकाऊन्टंट जी. जी. साठे, श्री. रामस्वामी (MD & CEO - Quadratic Financials) व श्री. सुरेंद्र कांस्थिया (Member of ICSI) हे तज्ज्ञ सहभागी झाले.

**National Operations Summit**
**राष्ट्रीय प्रचलन संमेलन**

Creatubg Values Through Operations & Technology या विषयावर आधारित संमेलनात उद्योग संस्थांमधील अनुभवी तज्ज्ञ मंडळी तसेच या विषयातील अभ्यासक / संशोधकांकडून उत्पादन क्षेत्रातील तसेच सेवाक्षेत्रातील कार्यपद्धती संदर्भात विविध पैलू तसेच प्रचंड वेगाने बदलणारे नवीन तंत्रज्ञान संबंधातील विविध मुद्दे याबद्दल जाणून घेणे आणि त्यावरील चर्चा अशा स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात संचालक डॉ. के. सूर्यनारायणन यांच्या उद्घाटनपर भाषणाने झाली. अशा प्रकारच्या संमेलनामुळे विद्यार्थ्यांना विविध विषयांची अधिक माहिती तर मिळतेच तसेच विविध विषयांमधील परस्पर संबंधाबाबतीतही ज्ञान मिळते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यानंतर डॉ. गुरुप्रसाद मूर्ती (सर संचालक) व डॉ. पी. एम. केळकर (अधिष्ठाता) यांनीही संमेलनाच्या विषयासंदर्भात थोडक्यात विवेचन सादर केले.

संमेलनाचे प्रमुख अतिथी श्री. व्ही. राजू (Country Head, CCI Logistics Ltd.) यांनी 3 PL Warehousing Trends या विषयावरील आपल्या बीजभाषणात, भविष्यात जगातील आर्थिक महासत्ता बनू पाहणाऱ्या आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आजच्या विद्यार्थ्यांना भावी व्यवस्थापक म्हणून यशस्वी व्हायचे असल्यास सतत नावीन्याची कास धरणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच सध्याच्या काळात या तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे प्रचालन क्षेत्रात; पुरवठा साखळी आणि साठा व्यवस्थापन (Supply chain and Logistic) विभागात जागतिक पातळीवर जलद गतीने निर्णय घेणे कसे सोयीचे झाले आहे या संबंधी माहिती देखील त्यांनी दिली.

त्यानंतर श्री. प्रवीण आम्बेसकर यांनी ERP in Operations Management. या विषयावर आपली मते मांडली. त्यांच्या मते काही दशकांपूर्वी व्यवसाय व्यवस्थापनामधील विविध विभाग हे स्वतंत्रपणे कार्यरत असायचे परंतु नव्या ERP तंत्रज्ञानामुळे आता

जागतिक खेडे (global village) ही संकल्पना प्रत्यक्षात अवतरली आहे.

संमेलनातील पुढील वक्ते IES व्यवस्थापन महाविद्यालयातील प्रा. पी.जी. काणे यांनी Progress in Operation Practices over the years याविषयावर सादरीकरण केले. यामध्ये त्यांनी उद्योग व्यवस्थापनातील OPERATIONS (प्रचलन) या क्षेत्रातील प्रचलित पद्धतीत तसेच या विभागातील व्यवस्थापकीय व्यूहरचनेत मोठ्या प्रमाणावर कसे आणि केव्हा बदल होत गेले याचा एक ऐतिहासिक आढावा सादर केला.

त्यानंतर डॉ. शिरीष शिरसाट (G.M., Allana Industries) यांनी Supply Chain Management in Mfg. and Exports या विषयावर आपली मते मांडली त्यांच्या मते योग्य पुरवठा साखळी व्यवस्थानासाठी उत्पादन प्रक्रियेचे संपूर्ण/ योग्य पायाभूत/ प्राथमिक ज्ञान, सामान्य ज्ञान, आणि तर्क या गोष्टी आवश्यक असतात. ERP-SAP हे आधुनिक तंत्रज्ञान त्याच्या उद्योग संस्थेमध्ये अत्यंत फायद्याचे कसे ठरले याची उदाहरणेही त्यांनी सांगितली. तसेच या योग्य व्यवस्थानासाठी रोजच २४ तास सतर्क असणे आवश्यक असते असेही मत त्यांनी व्यक्त केले.

संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात IIT मुंबई या संस्थेतील प्रा. श्याम असोलेकर यांनी Updates and Trends in Environment Management या विषयावर आपले भाषण सादर केले. यामध्ये त्यांनी भारतातील विविध पर्यावरण समस्या यावर भाष्य केले आणि आपण सर्वांनी मिळूनच या समस्या सोडवण्यासाठी मोहीम आखणे हे आपले कर्तव्य आहे असे मत व्यक्त केले या संदर्भात भारताच्या घटनेतील मार्गदर्शक तत्त्वे (act.48-a) आणि (act.5-a(g) या बद्दलही त्यांनी थोडक्यात माहिती दिली.

त्यानंतर श्री. अजित यादव (Head Business Excellence, Mahindra and Mahindra Financial Services) यांनी Quality Practices in Banking / Financial Industry या विषयावर आपली मते मांडली. यामध्ये त्यांनी lean six sigma या दृष्टिकोनावर भर दिला त्यांच्या मते lean six sigma या पद्धतीचा सेवा क्षेत्रामध्ये वापर केल्यास कार्य प्रक्रियेतील अति उत्पादन, अवाजवी पुन्हा पुन्हा कराव्या लागणाऱ्या प्रक्रिया, प्रतीक्षा, वाहतूक, याद्या बनवणे इत्यादीमध्ये वाया जाणारा वेळ शोधून तो कमी करणे शक्य होते. तसेच lean six sigma पद्धती संदर्भात DMAIC तत्त्वज्ञानाबद्दलही त्यांनी थोडक्यात माहिती दिली.

त्यानंतर डॉ. शिल्पा ताटके (General Manager Operations, Jupiter Hospital) यांनी Service Operations in Healthcare Industry या विषयावर सादरीकरण केले. यामध्ये त्यांनी आरोग्य सेवा क्षेत्रातील प्रचलन व्यवस्थापनाचे थोडे वेगळेपण काही उदाहरणे देऊन समजून सांगितले. तसेच आरोग्य सेवेवरील वाढता खर्च, खाजगी इस्पितळाचे बदलणारे स्वरूप, आरोग्य सेवेबरोबरच इतर आगत्य सेवावरही दिला जाणारा भर, योग्य व्यवस्थापनासाठी विविध कौशल्ये असणारा कर्मचारी वर्ग त्यांचे प्रशिक्षण इत्यादी मुद्द्यांवरही त्यांनी भाष्य केले.

श्री. जयराम एस. (Executive Director, Schnellecke Jeena Logistics Pvt., Ltd.) यांनी Building Value Across Supply Chain या विषयावर आपली मते मांडली. त्यांनी प्रामुख्याने integrated logistics supply chain integrated supply chain and value chain याबद्दल माहिती दिली तसेच पायाभूत सुविधा, योग्य कुशल कर्मचारी वर्ग, ग्राहकाच्या मागण्या आणि पुरवठा यामधील तफावत, नियम, किमतीवरील दबाव इत्यादी मुद्यांसंदर्भात समोरील आव्हानांबाबतही माहिती दिली.

संमेलनाच्या निमित्ताने प्रचलन व्यवस्थापनातील उत्कृष्ट पद्धती (Best practices in the real world of

Operations Managements) या विषयावर विद्यार्थ्यांनी तयार केलेले Videos आणि Posters यांची स्पर्धा घेण्यात आली होती. संमेलनाच्या शेवटच्या सत्रात या स्पर्धेतील विजेत्यांची नावे जाहीर करण्यात आली व त्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

**राष्ट्रीय वार्षिक चर्चासत्र २०१३**
**कौशल्याच्या माध्यमातून प्रतिस्पर्धा**
**Competing Through Talent (CTT)**

कुशल कर्मचाऱ्यांची कमतरता, व त्यांची निवड तसेच त्यांची योग्य पदावर नेमणूक, आणि कुशल कर्मचाऱ्यांना आपल्याच उद्योग संस्थेत टिकवून ठेवणे ही आजच्या उद्योग संस्था समोरील खूप मोठी आव्हाने आहेत; आणि म्हणूनच डॉ. व्ही. एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था (डॉ. व्ही. एन. ब्रीम्स) आणि Bombay Management Association (BMA), यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या वर्षीच्या राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये कौशल्याच्या माध्यमातून प्रतिस्पर्धा (Competing Through Talent (CTT).) हा विषय निवडला गेला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. के. सुर्यानारायणन यांच्या स्वागत पर भाषणाने झाली यामध्ये त्यांनी सर्व प्रमुख अतिथींचे आणि उपस्थितांचे स्वागत केले व चर्चासत्राच्या मुख्य विषयाने तसेच या कार्यक्रमात चर्चिल्या जाणाऱ्या या विषयाच्या इतर उप-विभागांची थोडक्यात माहिती उपस्थितांना सांगितली.

त्यानंतर डॉ. विजय बेडेकर (कार्याध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ) यांनी कौशल्य व्यवस्थापन हा विषय आपल्या देशाच्या विकासाला योग्य दिशा किंवा विकासाची योग्य आखणी करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट मत आपल्या भाषणात व्यक्त केले. त्यांच्या मते कौशल्य व्यवस्थापन हे कायद्याने किंवा नियमाने सक्ती करून राबविले जाऊ शकणार नाही तर प्रत्येकाने या विषयाचे गांभीर्य जाणून घेऊन लहानपणापासूनच मुलांमधील कौशल्य हेरणे, त्याची मशागत करणे, जोपासना करणे, कौशल्याचा आदर करणे या सर्व गोष्टी आपल्या मनोवृत्तीमध्ये असल्या पाहिजेत; या गोष्टी आपल्या संस्कृतीचाच एक भाग असला पाहिजे की ज्या मुळे उद्योग व्यवस्थेमध्ये निर्माण होणारी कौशल्याची कमतरता कमी करण्यासाठी उपाय योजना आखता येतील.

अध्यक्षांच्या भाषणानंतर डॉ. पी. एम. केळकर (अधिष्ठाता) यांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. इंद्रपाल सिंग आणि श्री. अशोक शहाणे यांचा परिचय करून दिला.

प्रमुख अतिथी श्री. इंद्रपाल सिंग यांनी आपल्या भाषणात वाढती बेरोजगारी आणि १०० कोटी पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात कुशल कर्मचाऱ्यांचा तुटवडा भासतो ही खूपच चिंतेची अवस्था असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. आणि ही परिस्थिती सुधारण्यासाठी आपल्यालाच एक नवी कार्यपद्धती तयार केली पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

श्री. ए. डी. शहाणे (V.P. L&T) यांनी आपल्या बीज भाषणात सांगितले की उद्योगामध्ये सध्या स्पर्धेचे युग आहे. त्यामुळे तुम्हांला नोकरीच्या पहिल्या दिवसा पासून तुमचे कौशल्य सिद्ध करावे लागते. आजकालचे उद्योग केवळ विकासाचे ध्येय बाळगत नाहीत तर उत्कृष्टतेचे शिखर गाठण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. कुशल कर्मचारी वर्ग ही या उत्कृष्टते साठी महत्त्वाचे घटक आहेत. L&T हा उद्योग समूह देखील आपल्या मानवी साधन संपत्तीकडे याच दृष्टिकोनातून पाहतो. उद्योग समूहातील कौशल्य व्यवस्थापन ही वरिष्ठ व्यवस्थापकाची मुख्य जबाबदारी आहे आणि त्यासाठी योग्य प्रोत्साहन आणि पुरस्कार पद्धती हे कौशल्य टिकून राहण्यासाठी उपयोगी ठरते असेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी देखील नोकरीकडे फक्त रोजगार

म्हणून न पाहता व्यावसायिक दृष्टीने पाहिले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यानंतर पार पडलेल्या डॉ. व्ही. एन. ब्रीम्स (DR VN BRIMS) आणि बॉम्बे मॅनेजमेंट असोसिएशन (BMA) यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्या जाणाऱ्या पुरस्कार विरतण कार्यक्रमात डॉ. पी. एम. केळकर (अधिष्ठाता) यांनी या वर्षीच्या पुरस्कार संबधीच्या निकषांबद्दल थोडक्यात माहिती दिली व खालील उद्योग संस्थाना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

Best Small Scale Industry : Mr. Suresh Dol, Managing Director of M/s. Dol Motors Pvt. Ltd., Navi Mumbai

Best Medium Scale Industry: To Prakash Kumar, Managing Director of M/s. Praveen Industries Pvt. Ltd. Navi Mumbai.

Best Large Scale Industry: To Mr. Bhaskar Shah, Managing Director of M/s. Jabs International, Navi Mumbai

या नंतर डॉ. गुरुप्रसाद मूर्ती (सर संचालक) यांनी डॉ. व्ही. एन. ब्रीम्स तर्फे प्रकाशित झालेल्या २ संशोधनपर पुस्तकांविषयी थोडक्यात माहिती दिली आणि

1) Research study (2012) on "Competing through Talent",
2) Research Monograph on "Paradigm Shift in Marketing" the theme proposed for the 2014 annual seminar.

या दोन पुस्तकांचे डॉ. विजय बेडेकर आणि इतर मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

चर्चासत्राची सुरुवात सहा. प्राध्यापिका तेजल धुल्ला यांनी सादर केलेल्या Talent Crunch या विषयावरील विवेचनाने झाली. डॉ. व्ही. एन. ब्रीम्स ने केलेल्या CTT (Competing Through Talent) या २०१२ या वर्षीच्या सर्वेक्षणानुसार औद्योगिक क्षेत्रात Operationa या विभागात talent crunch ही समस्या तीव्रपणे जाणवते असे त्यांनी सांगितले.

त्यानंतर The HR Club या संस्थेचे संस्थापक श्री. श्रीनिवासन अय्यर यांनीही Talent Crunch या विषयावर आपली मते मांडली. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते म्हणाले, की MBA पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना असे वाटत असते की आता लगेचच नोकरी मिळणार पण बरेचदा प्रत्यक्षात तसे होत नाही, आपल्या महाविद्यालया कडूनही त्यांच्या खूप अपेक्षा असतात पण अनेकदा त्याही पूर्ण होत नाहीत; पण तरीही विद्यार्थ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की कोणत्याही एकाच विषय शाखेत अभ्यासक्रम पूर्ण करणे हे फक्त पदवी मिळे पर्यंतच आवश्यक असते प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात यशस्वी अष्ट पैलू असणे महत्त्वाचे असते.

त्यानंतर श्री. श्याम अय्यर (Head HR, Tata Power) यांनी देखील Talent Crunch या विषयावर बोलताना आजकाल उद्योग जगतामध्ये; बहु आयामी किंवा विविध क्षेत्रात पारंगत, तंत्रज्ञान क्षेत्रातील बदलांना शिकून सामोरे जाणाऱ्या अशा कर्मचारी वर्गाला जास्त मागणी आहे असे सांगितले.

श्री. आर. श्रीनिवासन (Director, AIRA Consulting) यांनी लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रातील Talent Crunch या विषयावर बोलताना सांगितले की, ''लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रात रोजगाराच्या संधी / कौशल्याची मागणी आणि व्यवस्थापन संस्था / महाविद्यालयांकडून होणारा पुरवठा यांचे व्यस्त प्रमाण आहे. ''त्यांच्या मते खरे तर लघू आणि मध्यम उद्योग क्षेत्रात विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत परंतु या क्षेत्रात बरेच ठिकाणी योग्य व्यवस्थापकीय संरचना नसल्याने, किंवा कार्य पद्धती मधील कौशल्याची योग्य मापन पद्धती नसल्याने हे क्षेत्र अजूनही फारसे आकर्षक

ठरत नाही. परंतु त्यांच्या मते ज्या तरुण विद्यार्थ्यांना सार्थक पद्धतीने आपले भवितव्य (Career) आखायचे आहे त्यांच्यासाठी या क्षेत्रातील अनुभव उपयोगी ठरू शकतो आणि त्यासाठी व्यवस्थापन अभ्यास संस्था आणि या उद्योग संस्थानी एकत्र येऊन हा कौशल्याचा तुटवडा भरून काढला पाहिजे, असे मत व्यक्त केले.

श्री. विकास शिरोडकर (VP HR General Motors) यांनी आपल्या भाषणात कौशल्याची खरेदी विरुद्ध कौशल्याचा विकास या मुद्द्यावर आपली मते मांडली. त्यांच्या मते कोणत्याही उद्योग संस्थेला आपला कुशल कर्मचारी वर्ग टिकवून ठेवण्यासाठी वेतन वाढीवर होणारा खर्च आणि त्याचा उद्योगाला होणारा नफा याचा विचार करावा लागतो. त्यासाठी योग्य मानव संसाधन व्यूहरचना आखणे आवश्यक ठरते.

श्री. शैलेंद्र ढमढेरे (General HR Magager J&J) देखील Talent Attraction या विषयावर आपले विचार मांडले. त्यांच्या मते उद्योग संस्थेचे उद्दिष्ट आणि व्यूहरचना जर निश्चित/अबाधित असतील तर Talent Attraction सोपे जाते.

कार्यक्रमाच्या तिसऱ्या सत्रात सहा. प्राध्यापिका सुखदा तांबे यांनी Talent Deployment या तिसऱ्या सत्रातील विषयाची ओळख करून दिली आणि २०१२ या वर्षीच्या सर्वेक्षाणातील निष्कर्षा नुसार Competency, C = (a*ASK) ही संकल्पना समजावून सांगितली व या निष्कर्षानुसार व्यवस्थापक ही कर्मचाऱ्यांची निवड करताना प्रथम ज्ञान आणि नंतर कला आणि कौशल्याला प्राधान्य देतात असे दिसून आल्याचे सांगितले.

श्री. शरद गांगल (VP H.R, Thermax Ltd.) यांनी Talent deployment याविषयावर बोलताना योग्य व्यक्तीची योग्य वेळी योग्य जागेवर नेमणूक करणे कसे महत्त्वाचे आहे तसेच succession planning या मुद्यावरही आपले विचार व्यक्त केले.

चर्चासत्राच्या ४ थ्या सत्राची सुरुवात देखील सहा. प्राध्यापिका यांनी Talent Retention या विषया संदर्भात विवेचन सादर करून केली. २०१२ च्या CTT सर्वेक्षानानुसार Talent Retention बाबत विविध उद्योगांनी वापरलेल्या व्यूहरचने बद्दल माहिती दिली.

त्यानंतर श्री. भास्कर जोशी (GM HR Somaiya Group of Industries) यांनी देखील उद्योग संस्थांना कराव्या लागणाऱ्या उपाय योजनांसंदर्भात दोन चित्रफितींच्या आधारे आपली मते व्यक्त केली. तसेच Talent Retention करताना विचारात घ्याव्या अशा अनेक मुद्यांची यादीच त्यांनी उपस्थितांना सांगितली.

त्यानंतर Media and Soft Skills या विषयाच्या प्रशिक्षिका अर्पिता घोष यांनी Talent Retention बद्दल बोलताना असे सांगितले की कर्मचाऱ्यांची काळजी घेणे या दोन गोष्टी Talent Retention साठी उपयोगी ठरतात. तसेच कर्मचाऱ्यांची ध्येये / उद्दिष्टे आणि उद्योग संस्थेची ध्येये / उद्दिष्टे ही जर परस्परांशी संबंधित असतील तर त्याची ही Talent Retention साठी मदत होते असे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यानंतर चर्चासत्राच्या शेवटच्या सत्रात डॉ. के. सूर्यनारायणन यांच्या अध्यक्षतेखाली एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले व त्यामध्ये सौ. निर्मला मेहेंदळे, श्री. अरुण चीतलांगीया, श्री. ऑब्रे रेबेल्लो आणि श्री तृषार देसाई या उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनी सहभाग घेतला आणि कौशल्य व्यवस्थापन या विषयावर आपली मते मांडली तसेच उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. डॉ. पी. एम. केळकर (अधिष्ठाता) यांनी केलेल्या आभार प्रदर्शना नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

●●●

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयीः**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.


६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

# स्वप्न साकारत आहे...



हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा –
ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,
शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,
दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान
भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा

– डॉ. वा. ना. बेडेकर

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.